बंदूकींचे तसेच शस्त्र व दारुगोळा होलसेल व रिटेल विक्रेते
परवाना धारकांसाठी बंदूक तसेच विना परवाना धारकांसाठी एअर गण, एअर पिस्टल CO2 खरेदी-विक्री व दुरुस्ती
SINGH GUN HOUSE बंदुक घर
सर्व प्रकारचे ओरिजनल (खऱ्या) रिव्हॉल्हर, पिस्टल १२ बोर, रायफल शस्त्र व दारुगोळा विक्रेते
महाराष्ट्रातील सर्वात मोठे बंदुकी मिळण्याचे बंदुक घर
पत्ता : पत्रकार चौक, अहिल्यानगर
Mo. 9011808063 / 9860992722
शाखा : मुंबई, पुणे, नासिक, लातूर, सोलापूर, अहिल्यानगर, छ.संभाजीनगर, शिर्डी, परभणी, नवी मुंबई (वाशी), कल्याण, नागपूर, चाकण, शरदवाडी, श्रीरामपूर

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०६.०२.२०२६ | अंक नं. २५६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

फायदाच फायदा !
22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
2014 पासुन आपल्या सेवेत..सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

# महापालिकेच्या महापौरपदी राष्ट्रवादीच्या ज्योती गाडे तर उपमहापौरपदी भाजपाचे धनंजय जाधव बिनविरोध निवड





नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदांची निवड प्रक्रिया ६ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी तथा पीठासन अधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी महापौरपदी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या ज्योतीताई अमोल गाडे, तर उपमहापौरपदी भारतीय जनता पक्षाचे ॲड.धनंजय कृष्णा जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

महापौर पदासाठी सूचक नगरसेवक गणेश भोसले आणि अनुमोदन नगरसेवक अविनाश घुले, तर उपमहापौर पदासाठी सूचक निखिल वारे आणि अनुमोदन कुमार वाकळे यांनी प्रस्ताव मांडला. निवड प्रक्रिया शांततेत पार पडली. या सभेस महापालिका आयुक्त यशवंत डांगे, नगरसचिव मेहेर लहारे, तसेच सर्व नगरसेवक, अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी नव्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत सांगितले की, महापालिका प्रशासन आणि पदाधिकारी यांनी एकत्रितपणे कार्य केल्यास शहराच्या विकासाला गती मिळेल. पार्किंग व वाहतूक व्यवस्थेचे प्रश्न गंभीर असून, त्यावर जिल्हा प्रशासन, आरटीओ आणि महापालिका यांनी संयुक्तपणे उपाययोजना राबवाव्यात. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार शहरातील अनधिकृत होर्डिंग्ज व बॅनर्स हटवावेत, जेणेकरून नागरिकांमध्ये चांगला संदेश जाईल. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी नगरकरांचा विश्वास संपादन करणारे काम उभे करावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

ज्योतीताई गाडे यांनी सांगितले की, आजपासूनच कार्याची सुरुवात करत असून शहरातील मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येईल. सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहू. अहिल्यादेवी होळकरांच्या आदर्शावर आधारित विकासाचा आराखडा उभा करू.

धनंजय जाधव यांनी सांगितले, महापौर व आम्ही सर्वजण एकत्र येऊन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणार आहोत. सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन लोकाभिमुख निर्णय घेत नगरकरांची सेवा करणे, हीच माझी प्राथमिकता असेल, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी सर्व नगरसेवकांचे व नागरिकांचे आभार मानले तसेच सभागृहाच्या वतीने अजितदादा पवार यांना श्रद्धांजलीही वाहिली.

यावेळी आमदार संग्राम जगताप, शितलताई जगताप, बाबासाहेब वाकळे, गणेश भोसले, अनिल बोरुडे, संपत बारस्कर, कुमार वाकळे, अविनाश घुले, मनोज कोतकर, डॉ. सागर बोरुडे, सुरेश बनसोडे, प्रकाश भागानगरे, महेश तवले, बाली बांगरे, दत्ता गाडळकर, महेश लोंढे, ऋग्वेद गंधे, मनोज दुल्लम, सुभाष लोंढे, विजय पठारे, अमोल येवले, मोहित पंजाबी, दिपाली बारस्कर, पुष्पा बोरुडे, शारदा ढवण, संध्या पवार, गीतांजली काळे, कांताबाई शिंदे, आशाताई डागवाले आणि दत्ता कावरे, श्रीपाद छिंदम, नवनाथ कातोरे आदी उपस्थित होते. *(संबंधित वृत्त पान २ वर)*

## अहिल्यानगर-पुणे रेल्वे डबल लाईनचा डीपीआर तयार

**प्रकल्पाच्या मंजुरीसाठी पाठपुरावा सुरु; खासदार नीलेश लंके यांची माहिती**



नगर – अहिल्यानगर जिल्ह्याच्या दीर्घकालीन विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या अहिल्यानगर-पुणे नवीन दुहेरी (डबल लाईन) रेल्वेमार्गाचा डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट (डीपीआर) तयार झाला असून, या प्रकल्पाला तातडीने मंजुरी मिळावी यासाठी केंद्र सरकारकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली.

केंद्र सरकारच्या पीएम गतीशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनअंतर्गत पुणे-नाशिक रेल्वे कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासाठी विविध टप्प्यांवर काम सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून १३३ किलोमीटर लांबीचा अहिल्यानगर-पुणे नवीन डबल लाईन रेल्वेमार्ग प्रस्तावित असून, हा मार्ग अहिल्यानगर जिल्ह्यातील भागातून जाणार आहे.

या संदर्भात खासदार लंके म्हणाले की, हा प्रकल्प केवळ दोन शहरांमधील अंतर कमी करणारा नसून शेतकरी, विद्यार्थी, कामगार, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात थेट सकारात्मक बदल घडवणारा आहे. डीपीआर तयार होणे ही महत्त्वाची पायरी असून, आता मंजुरी व प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणे आवश्यक आहे.

अहिल्यानगर परिसरात यापूर्वीच रेल्वे पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय प्रगती झाली आहे. पुणतांबा -निंबळक दुहेरीकरण पूर्ण, निंबळक-अहिल्यानगर दुहेरीकरण प्रगतीपथावर असून, साईनगर शिर्डी-पुणतांबा दुहेरीकरणाला मंजुरी मिळाल्याने अहिल्यानगर हा पुणे, नाशिक, शिर्डी आणि मराठवाडा मार्गांचा केंद्रबिंदू ठरत आहे.

अहिल्यानगर-पुणे डबल लाईन प्रकल्पामुळे शेतमाल वाहतूक सुलभ होईल, उद्योगांना चालना मिळेल, रोजगारनिर्मिती वाढेल आणि धार्मिक पर्यटनालाही लाभ होईल, असेही खासदार लंके यांनी स्पष्ट केले. केंद्र व राज्य शासनातील संबंधित विभागांशी समन्वय साधून हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

## हातचलाखी करत चांदणी चौकात महिलेचे दागिने व रोकड लंपास

नगर – शहरात चोऱ्यांचे सत्र सुरूच असून, चांदणी चौक परिसरात एका अनोळखी महिलेने हातचलाखी करत एका सेवानिवृत्त महिलेची सोन्याची बोरमाळ आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत वेणू भागुजी पवार (वय ६२, रा. रंगभवन शेजारी, सर्जेपुरा) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या ५ फेब्रुवारी रोजी दुपारी पावणेदोनच्या सुमारास चांदणी चौक परिसरातून जात होत्या. त्यावेळी एका अनोळखी महिलेने लबाडीच्या इराद्याने त्यांच्या गळ्यातील सुमारे ३० हजार रुपये किमतीची पाऊण तोळ्याची सोन्याची बोरमाळ आणि २ हजार रुपयांची रोकड, असा एकूण ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलिसांनी अज्ञात महिलेविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा नोंदवला आहे. घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार आय. आय. पठाण करत आहेत.

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

अकौंटंट पाहिजे
टॅलीचे ज्ञान आवश्यक आकर्षक पगार+ पी.एफ, मेडिक्लेम, इन्शुरन्स सुविधा उपलब्ध.
प्रॉम्प्ट टूलिंग इंडिया प्रा.लि.
ऋणानुबंध अपार्टमेंट, फेज-२, गुलमोहररोड, सावेडी, अहिल्यानगर
9765111511,9922233900

## वाहनांवरील ‘ब्लॅक फिल्म’विरोधात अहिल्यानगर शहरामध्ये मोहीम

**४५८ वाहनांवर दंडात्मक कारवाई, २०२१ वाहनांची तपासणी : साडेसहा लाख रुपयांचा दंड**

नगर – प्रादेशिक परिवहन विभागाने पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने वाहनांच्या विंडस्क्रीन व खिडक्यांच्या काचांवर बेकायदेशीरपणे लावण्यात येणाऱ्या ‘ब्लॅक फिल्म’विरोधात जिल्ह्यात विशेष संयुक्त तपासणी मोहीम राबवली. २८ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत राबविण्यात आलेल्या या मोहिमेत एकूण २ हजार २१ वाहनांची तपासणी करण्यात आली. यात दोषी आढळलेल्या ४५८ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून, एकूण ६ लाख ४६ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला असल्याची माहिती सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धार्थ ठोके यांनी दिली.



प्रादेशिक परिवहन विभागाने पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने वाहनांच्या विंडस्क्रीन व खिडक्यांच्या काचांवर बेकायदेशीरपणे लावण्यात येणाऱ्या ‘ब्लॅक फिल्म’विरोधात जिल्ह्यात विशेष संयुक्त तपासणी मोहीम राबवली.

या मोहिमेत अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालय व श्रीरामपूर उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत कार्यरत सर्व वायुवेग पथके, तसेच जिल्ह्यातील १४ तालुका पथकांमधील मोटार वाहन निरीक्षक व सहायक मोटार वाहन निरीक्षकांनी सहभाग घेतला. या पथकांनी एकूण २०२१ वाहनांची कसून तपासणी केली.

तपासणीदरम्यान ज्या ४५८ वाहनांवर बेकायदेशीर ब्लॅक फिल्म आढळल्या, त्यांच्यावर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. आकारण्यात आलेल्या ६ लाख ४६ हजार रुपये दंडापैकी ३७ हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे. तसेच संबंधित वाहनांवरील ब्लॅक फिल्म्स काढून टाकण्यात आल्या आहेत.

या विशेष मोहिमेत ब्लॅक फिल्म व्यतिरिक्त इतर बाबींचीही पडताळणी करण्यात आली. यात वैध विमा नसलेली वाहने, नोंदणी प्रमाणपत्र किंवा वाहन परवाना नसणे, वाहन चालवण्याचा परवाना नसणे, वाहनांतील दिव्यांमधील त्रुटी व वायू प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवरही दंडात्मक कारवाई करण्यात आली.

जिल्ह्यातील वाहन मालक व चालकांनी मोटार वाहन कायद्यातील तरतुदींनुसार वाहनांची समोरील (दर्शनी) काच व खिडक्यांच्या काचांवर ब्लॅक फिल्म बसवू नये. कायद्यातील अटी व शर्तींचे तसेच वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सहकार्य करावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी केले आहे.

पाहिजेत
सावेडी येथे कापड दुकानात (पुर्ण वेळ)
- सेल्सगर्ल्स
- सेल्समन
(अनुभव आवश्यक)
9075500840

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे. आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

गुडघा किंवा हिप दुखत आहे? चालणे बसणे कठीण झाले आहे का?
अत्याधुनिक जॉईंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया
आरोग्यसदन हॉस्पिटल
डॉ. प्रशांत काळे
DNB ऑर्थोपेडिक सर्जन जॉईंट रिप्लेसमेंट व फ्रॅक्चर तज्ञ
गुडघा व हिप सांधा बदल
शस्त्रक्रिया कमी वेदना
लवकर बरे होणे
अनुभवी व विश्वासार्ह उपचार
Fracture Accident साठी तत्काळ उपचार
24/7 आपात्कालीन सेवा
वेदना विसरा.. पुन्हा मोकळेपणाने चालायला सुरुवात करा.
पत्ता : नगर-मनमाड रोड, सावेडी नाका, सावेडी, अ.नगर
संपर्क : 8981008008

लूट लो ऑफर..
फक्त पुरुषांसाठी शर्ट, टि-शर्ट, लोवर या पैकी काहिही ३ घ्या फक्त रु.५००/- मध्ये
फॉरमल पॅन्टस, जीन्स Rs.300/- पासुन पुढे
हाप व फुल जेन्टस् ट्राऊसेट Rs.300/- मध्ये उपलब्ध
7XL पर्यंत
फक्त पुरुषांसाठी जेन्टस् शर्ट, नाईट पॅन्ट, टि शर्ट, ट्राऊझर Rs.200/- पासुन पुढे
कार्गो पॅन्ट Rs.250/-
लेडिज व जेन्टस् वॉचेस (घड्याळ) Rs.100/-
जिन्स व फॉर्मल पॅन्ट ४४ साईज पर्यंत व कॉटन पॅन्ट ३८ साईज पर्यंत उपलब्ध
तसेच डिझायन, चेक्सचे शर्ट व व्हाईट शर्ट 7XL साईज पर्यंत उपलब्ध
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# ....तर ९ फेब्रुवारीपासून महानगरपालिकेसमोर 'कोरोना योद्धे' बेमुदत आमरण उपोषण करणार

## जीव धोक्यात घालून अत्यावश्यक सेवा बजावलेल्यांना सेवेत सामावून घेतले जात नसल्याने तीव्र नाराजी : सनी माघाडे



नगर - कोरोना काळात जीव धोक्यात घालून अहिल्यानगर महानगरपालिकेत अत्यावश्यक सेवा बजावलेल्या कोरोना योद्ध्यांना अद्याप सेवेत सामावून घेतले जात नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत वारंवार अर्ज करून तसेच पंतप्रधान कार्यालयाच्या तक्रार निवारण पोर्टलवर तक्रार नोंदवूनही महानगरपालिका गांभीर्याने दखल घेत नसल्याचा आरोप सनी भीमराव माघाडे (कोरोना योद्धे) यांनी केला आहे.

सनी माघाडे यांनी सांगितले की, कोरोना महामारीच्या काळात त्यांनी सुमारे सात महिने अहिल्यानगर महानगरपालिकेत अत्यावश्यक सेवेत काम केले. त्या काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता सेवा दिली. मात्र कोरोना प्रादुर्भावानंतर नियुक्त्या कमी करण्यात आल्या आणि आज त्यांच्या समोर उपासमारीची वेळ आली आहे.

दरम्यान, राज्य शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दहा वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, कोरोना काळात प्रत्यक्ष मैदानात काम केलेल्या कोरोना योद्ध्यांसाठी ही अट शिथिल करून थेट सेवेत सामावून घ्यावे, अशी मागणी करण्यात येत आहे. यासंदर्भात यापूर्वीही निवेदन देण्यात आले होते, मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात येतो.

या संदर्भात पंतप्रधान कार्यालयाकडून अहिल्यानगर महानगरपालिकेला तक्रारीची दखल घेण्याचे निर्देश देण्यात आले असतानाही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही, असेही माघाडे यांनी नमूद केले.

जर येत्या २ दिवसांत महानगरपालिकेकडून सेवेत सामावून घेण्याची आदेशपत्रे (ऑर्डर) काढली गेली नाहीत, तर ९ फेब्रुवारीपासून अहिल्यानगर महानगरपालिकेसमोर बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या उपोषणासंदर्भात उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस अहिल्यानगर महानगरपालिका व जिल्हा प्रशासन जबाबदार राहील, असेही कोरोना योद्ध्यांनी स्पष्ट केले आहे.

# अहिल्यानगरच्या बीएसएफ जवानाला आले 'वीरमरण'

**नागालॅण्डमध्ये कर्तव्य बजावताना काळाचा घाला, शासकीय इतमामात अंत्यसंस्कार**



प्रशांत बुचडे

नगर - देशाच्या सीमेवर अविरत सेवा बजावत असताना पारनेर तालुक्यातील विरोली येथील सिमा सुरक्षा दलाचा (बीएसएफ) जवान प्रशांत अशोक बुचडे (वय २७) यांना नागालँड राज्यातील सटाका चौकीवर नेमणुकीदरम्यान वीरमरण आले. ही घटना ३ फेब्रुवारी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास घडली. या वीर जवानावर विरोली गावात ६ फेब्रुवारीला सकाळी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

प्रशांत बुचडे हे सिमा सुरक्षा दलाच्या १११ बटालियनमध्ये कार्यरत होते. नागालँडसारख्या दुर्गम व संवेदनशील भागात देशरक्षणाची जबाबदारी सांभाळताना त्यांना वीरमरण आले. कर्तव्यावर असताना आलेल्या या दुर्दैवी घटनेने देशाने एक कर्तव्यनिष्ठ जवान गमावला आहे.

लहानपणापासूनच देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगणारे प्रशांत बुचडे २०२१ साली सिमा सुरक्षा दलात भरती झाले होते. कठोर प्रशिक्षण, शिस्त आणि निष्ठा यांच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच आपल्या कामाची छाप उमटवली होती. गावातील तरुणांसाठी ते प्रेरणास्थान होते. प्रशांत यांच्या वीरमरणाची बातमी कळताच विरोली गावावर शोककळा पसरली. अवघ्या २७ व्या वर्षी असा दुर्दैवी अंत झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. प्रशांत बुचडे यांच्या पश्चात आई-वडील, एक भाऊ व एक बहीण असा परिवार आहे. कुटुंबाचा आधारवड अचानक हिरावल्याने आई-वडिलांचे दुःख शब्दांत मांडणे अशक्य झाले आहे. कुटुंबीयांच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू संपूर्ण गावाला हेलावून टाकणारे होते.

शहीद जवान प्रशांत बुचडे यांच्या पार्थिवावर ६ फेब्रुवारी रोजी सकाळी विरोली गावात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्ययात्रेवेळी पोलीस दलाने बंदुकीतून हवेत फैरी झाडत मानवंदना दिली.

यावेळी माजी सैनिक, लोकप्रतिनिधी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महापौरपदी निवड झाल्यावर ज्योती गाडे यांनी दुपारी आमदार संग्राम जगताप व महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत आपला पदभार स्वीकारला. (छाया - लहू दळवी)



महापौरपदी ज्योती गाडे व उपमहापौर पदी धनंजय जाधव यांची निवड झाल्यावर निवडणूक निर्णय अधिकारी व जिल्हाधिकारी पंकज आशिया व महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी दोघांचा सत्कार करून अभिनंदन केले.(छाया - लहू दळवी)

# महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांनी घेतला 'पदभार'

नगर - महापालिकेच्या नूतन महापौर ज्योती गाडे यांनी दुपारी आमदार संग्राम जगताप व महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत आपला पदभार स्वीकारला. यावेळी त्यांचे डोळे पाणावले. महापौर ज्योती गाडे यांची मोठी बहीण माजी नगरसेविका शितल जगताप यांनीही त्यांची गळाभेट घेऊन अभिनंदन केले.

यावेळी भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष युतीचे नगरसेवक, दोन्ही पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जय जयकार यावेळी करण्यात आला. तसेच जो हिंदू हित की बात करेगा, वही महापालिका मे राज करेगा, अशाही घोषणा यावेळी देण्यात आल्या.

# महानगरपालिका निवडणूक लढविलेल्या उमेदवारांना १५ फेब्रुवारीपर्यंत सर्व 'खर्च' सादर करावा लागणार

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकमध्ये निवडणूक लढविलेल्या सर्व उमेदवारांनी (बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांसह) आपला निवडणूक खर्चाचा हिशोब निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक आहे. १५ फेब्रुवारीपर्यंत खर्च सादर करावा लागणार आहे. खर्च सादर करण्यासाठी आता १० दिवस बाकी आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, निवडणूक निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत संबंधित उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा संपूर्ण तपशील सादर करणे आवश्यक आहे. यामध्ये निवडणुकीसाठी प्राप्त निधीचा तपशील नमुना क्रमांक एक, निवडणूक दैनंदिन व एकूण निवडणूक खर्चाचा तपशील नमुना क्रमांक दोन तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांसमोर साध्या कागदावर दिलेले शपथपत्र नमुना क्रमांक तीन या विहित नमुन्यांमध्ये सादर करणे बंधनकारक आहे.

सदर निवडणूक खर्चाचा हिशोब आवश्यक त्या मूळ कागदपत्रांसह उमेदवारांनी स्वतः च्या स्वाक्षरीनिशी प्रत्यक्ष निवडणूक खर्च कक्ष, महानगरपालिका मुख्य कार्यालय, अहिल्यानगर येथे कार्यालयीन वेळेत १५ फेब्रुवारी २०२६ अखेर सादर करावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने आयोगाने निश्चित केलेल्या कालावधीत व विहित पध्दतीने निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्यात कसूर केल्यास संबंधित उमेदवारास अनर्ह ठरविण्याची तरतूद आहे.

# चेहरा प्राण्याने कुरतडलेल्या अवस्थेत आढळला अनोळखी इसमाचा मृतदेह

नगर - नगर - दौंड रस्त्यावरील हिवरे झरे जवळ असलेल्या काळेवाडी (ता. नगर) शिवारात पुलाजवळ एका अनोळखी इसमाचा बेवारस अवस्थेत मृतदेह आढळून आल्याची घटना ३ फेब्रुवारी रोजी दुपारी उघडकीस आली. सदर इसमाचा चेहरा कोणत्या तरी प्राण्याने कुरतडलेल्या अवस्थेत असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मृत इसम अंदाजे ४० वर्षे वयाचा असून त्याची ओळख अद्याप पटलेली नाही. सदर इसम दौंड रस्त्यावरील काळेवाडी शिवारात पुलाजवळ बेवारस अवस्थेत आढळून आला. त्याचा चेहरा कोणत्या तरी प्राण्यांनी कुरतडलेला अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर नगर तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सदर मृतदेह येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केला. येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. कोल्हे यांनी दिलेल्या माहितीनुसार, नगर तालुका पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. दरम्यान, शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदरचा व्यक्तीचा मृत्यू कशाने झाला याची माहिती समोर येईल. त्याच्या मृत्यूविषयी माहिती घेण्याबरोबरच त्याची ओळख पटविण्याचे काम पोलिसांनी सुरु केले आहे. सदर इसमाबाबत काही माहिती असल्यास नगर तालुका पोलिस स्टेशनचे स.पो.नि. प्रल्हाद गिते (मो. ९८२३४४११५८) तसेच पो.हे.कॉ.शिवाजी माने (मो. ८१०८०७०७६९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पारनेर कारखाना विक्री घोटाळ्यातील दहा आरोपींचा 'अटकपूर्व जामीन' रद्द

**नगरच्या सत्र न्यायालयाचा निकाल, आरोपींच्या अटकेचे आदेश**

नगर - पारनेर तालुक्यातील देवीभोयरे येथील पारनेर सहकारी साखर कारखाना विक्री गैरव्यवहार प्रकरणातील दहा आरोपींना दिलेला अटकपूर्वक जामीन नगर येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश महेश लोणे यांनी रद्द केला आहे. आरोपींना तातडीने अटक करून पुढील तपासाचे आदेशही पोलिसांना दिलेले आहेत. अशी माहिती कारखाना बचाव कृती समितीचे वकील ॲड. रामदास घावटे यांनी दिली.

आरोपींमध्ये तलाठी किरण फातले, क्रांती शुगर या खाजगी कंपनीचे चेअरमन ज्ञानेश नवले, संचालक पांडुरंग नवले, दत्तात्रय नवले, भिकू नवले, जालिंदर नवले, गुलाब नवले, शिवराज नवले, श्रीधर नवले, निवृत्ती नवले यांचा समावेश आहे. पारनेर न्यायालयाच्या आदेशानंतर वर्षभरापूर्वी राज्य सहकारी बँक आणि क्रांती शुगर कंपनीवर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल झाला होता. पुढे सत्र न्यायालयाने आरोपींचा रिव्हीजन अर्ज फेटाळला. त्यानंतर आरोपींनी सत्र न्यायालयाकडे अटकपूर्व जामिनासाठी केलेला अर्ज अटी-शर्ती नुसार मंजुर केला होता.

मात्र न्यायालयाने घातलेल्या अटी - शर्तींचा भंग केल्याचा प्रकार लक्षात येताच, याप्रकरणी फिर्यादी असलेल्या पारनेर कारखाना बचाव समितीने आरोपींचा अटकपुर्व जामीन रद्द करणे कामी सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या गंभीर गुन्ह्यातील आरोपींनी अटकपूर्वक जामीनाच्या नावाखाली गैरफायदा घेऊन फिर्यादीवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. गुन्ह्यातील महत्वाचे पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता, तसेच तपासात पोलिसांना सहकार्य करत नसल्याचे पुरावे फिर्यादिकडुन न्यायालयासमोर ठेवण्यात आले.

सत्र न्यायालयाने या गंभीर प्रकाराची दखल घेऊन आरोपींना मंजुर केलेल्या अटकपूर्व जामीनाचे संरक्षण काढुन घेतले. आणि आरोपींना तातडीने अटक करून पुढील तपासाचे आदेश पोलिसांना दिलेले आहेत. याप्रकरणी सुमारे ४८ बनावट सातबारा उतारे तयार करणारा श्रीगोंदा - विसापुर येथे सध्या कार्यरत असलेला तलाठी किरण फातले याचाही अटकपूर्व जामीन जामीन न्यायालयाने रद्द केला आहे.

गुन्हा दाखल होवून वर्षे लोटले आहे. गुन्ह्यात एकुन ४२ साक्षीदार आहेत. त्यांची यादी फिर्यादिने तपासी अधिकारी यांना देवुनही आरोपींच्या राजकिय दबावापोटी साक्षीदारांचे जबाब नोंदवले जात नाहीत. या गुन्ह्याचे तपासी अधिकारी असलेले पारनेर पोलिस ठाण्याचे निरिक्षक समीर बारवकर यांची मुदती पुर्वीच बदली करण्यात आली आहे. त्यांची ही बदली या गुन्ह्यात आरोपींना मदत न केल्याच्या कारणाने केल्याचे कारखाना बचाव समितीचे बबन कवाद, साहेबराव मोरे यांनी सांगितले.

सदर प्रकरणाची सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश महेश लोणे यांचे समोर झाली, कारखाना बचाव कृती समितीच्या वतीने ॲड. रामदास घावटे, ॲड. सुदाम साठे, ॲड. उन्मेश चौधरी, ॲड. सोमनाथ गोपाळे यांनी बाजू मांडली.

# महावितरणकडून ७ फेब्रुवारी रोजी शटडाऊन; शहराचा पाणी पुरवठा १ दिवस उशिराने होणार

नगर - महावितरणकडून ७ फेब्रुवारीला दुरुस्तीच्या कामांसाठी शहर पाणी योजनेवर शटडाउन घेण्यात येणार आहे. तसेच, या काळात पाणी योजनेवरील दुरुस्तीची कामेही केली जाणार आहेत. या काळात मुळानगर, विळद येथील पाणी उपसा बंद राहणार असल्याने शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगर भागास एक दिवस विलंबाने पाणीपुरवठा होणार आहे.

शटडाउन मुळे ७ फेब्रुवारी रोजी बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सुर्यनगर, निर्मलनगर, - मुकुंदनगर तसेच सारसनगर, बुरुडगाव रोड, केडगाव, नगर-कल्याण रोडवरील सकाळी ११ नंतरचा पाणीपुरवठा शिवाजीनगर परिसर या भागास होणार नाही. या भागात ८ फेब्रुवारी रोजी पाणीपुरवठा होणार आहे. तसेच ८ फेब्रुवारीला पाणी पुरवठा होऊ घातलेल्या मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी व गुलमोहर रोड, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, स्टेशन रोड, आगरकर मळा, विनायक नगर भागास ९ फेब्रुवारी रोजी पाणी सोडण्यात येईल.

९ फेब्रुवारी रोजी पाणी वाटप असलेल्या सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, आनंदीबाजार, कापड बाजार, ख्रिस्त गल्ली, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर, सावेडी भागात १० फेब्रुवारी रोजी पाणीपुरवठा केला जाणार आहे.

नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने उपयोग करून महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# पोखर्डी येथे रस्ता अपघातात तरूणाचा मृत्यू

नगर - नगर तालुक्यातील पोखर्डी येथील जाधव खडी क्रेशरजवळ झालेल्या रस्ता अपघातात तरूणाचा मृत्यू झाला. उमेश रमेशकुमार परते (वय ३२, मुळ रा. मध्यप्रदेश, हल्ली रा. पोखर्डी) असे मयत तरूणाचे नाव आहे. ही घटना ४ फेब्रुवारी रोजी सकाळी घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

उमेश परते हे पोखर्डी येथे वास्तव्यास होते. ४ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास जाधव खडी क्रेशरजवळ त्यांचा अपघात झाला. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या उमेश परते यांना अशोक भानुदास वाणी (रा. पोखर्डी) यांनी तत्काळ उपचारासाठी येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून उमेश परते यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. याबाबत डॉ. यादव यांनी दिलेल्या माहितीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# भुईकोट किल्ल्याजवळ दुचाकी घसरून पडल्याने युवकाचा दुर्दैवी मृत्यू

नगर - दुचाकी घसरून पडल्याने डोक्याला मार लागून इयत्ता १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना नगर पाथर्डी रोड वर भुईकोट किल्ल्याजवळ ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास घडली. अब्दुल रहेमान मोमीन (वय १६, रा. मुकुंदनगर, मूळ रा. छत्रपती संभाजीनगर) असे मयत युवकाचे नाव आहे.

अब्दुल मोमीन हा मुळचा छत्रपती संभाजीनगरचा होता. तो शिक्षणासाठी मुकुंदनगर येथील नातेवाईकांकडे राहात होता. गोविंदपुरा येथील पी.ए.इनामदार इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये इयत्ता १० वी मध्ये तो शिक्षण घेत होता. लवकरच परीक्षा असल्याने शाळेत ५ फेब्रुवारीला १० वी च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. हा कार्यक्रम संपल्यावर काही मित्र चाँदबीबी महालावर फिरण्यासाठी गेले होते.

तेथून परतत असताना भुईकोट किल्ल्याजवळ अब्दुल याची दुचाकी घसरली, त्यामुळे तो रस्त्यावर पडला. त्याच्या डोक्याला गंभीर इजा झाली. त्याला तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेण्यात आले मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. जयेश लोखंडे यांनी त्यास तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले.

याबाबतचा अहवाल भिंगार कॅम्प पोलिसांना पाठविण्यात आला. पोलिसांनी या अहवालावरून आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.



कायनेटिक चौकात अवैध धंदे बंद करून तातडीने वाहतूक कोंडी बाबत उपाययोजना राबवाव्यात या मागणीचे निवेदन शहर युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष वैभव ढाकणे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे व जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांना दिले. समवेत पदाधिकारी.

# कायनेटिक चौकात अवैध धंदे व सततची वाहतूक कोंडी

**उपाययोजना कराव्यात : पालकमंत्र्यांसह व पोलीस अधीक्षकांना निवेदन**

नगर - कायनेटीक चौकातील अवैध धंदे त्वरित बंद करण्यात यावे, तसेच येथे होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे पालकमंत्री राधाकृष्ण विखे व जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे केली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नगर पुणे रस्त्यावरील कायनेटिक चौक हा परिसर अती महत्वाचा व कायम वर्दळीचा आहे. दौंड, पुणे, मुंबई, मराठवाडा, विदर्भ, या जिल्ह्यांसह विविध राज्यांसाठी कायनेटिक चौकातून रस्ता जातो. मात्र वाहतुकेचे योग्य नियोजन नसल्याने या चौकात कायम दिवसभर व रात्रीही मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असते. एवढा महत्वाचा चौक असूनही कायनेटिक चौकातील सिग्नल वर्षानुवर्षे बंदच आहेत. रोजच्या वाहतुकीच्या कोंडीचा सर्वसामान्य नागरिकांना तसेच चाकरमान्यांना मोठ्याप्रमाणात मानसिक त्रास होत असून त्यांचा मौल्यवान वेळ वाया जात आहे. या वाहतुकीच्या कोंडीमुळे अनेक अपघात रोजच होत आहेत. त्यामुळे प्रशासनाने कायनेटिक चौकातील अवैध धंदे बंद करून रोजच होणाऱ्या वाहतुकीच्या कोंडीवर तातडीने योग्य उपाययोजना राबवाव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा शहर युवकचे अध्यक्ष वैभव ढाकणे यांनी दिला आहे.

यावेळी मंगेश खताळ, मळू गाडळकर, अतुल कावळे, ओमकार आव्हाड, नागेश वनवे, निलेश हिंगे, सनी कार्पे, सुभाष वाघमारे, मयूर मुलतानी, अनिकेत चव्हाण, स्वप्नील भोरे, नाना मोरे, निलेश कदम, गणेश गोरे, मिलिंद शिंदे आदी उपस्थित होते.

# रामदास बनसोडे यांचे ह्रदयविकाराने निधन



नगर - येथील रामदास (रामा) छबू बनसोडे (वय ३७) यांचे ५ फेबुवारी रोजी ह्रदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, १ बहिण, पत्नी, ३ मुली असा परिवार आहे. मार्केटयार्ड येथील नंदकुमार इलेक्ट्रीकलचे ते संचालक होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### पपई खा वजन कमी करा

पपई हे वर्षाचे बाराही महिने सहज उपलब्ध होणारे फळ आहे. अगदी कमी किमतीत उपलब्ध असल्याने आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. पपई केवळ पचनसंस्थेसाठी चांगली मानली जात नाही तर वजन कमी करण्यासही ते उपयुक्त आहे. पपईचे इतर फायदे जाणून घेऊ या. पपई हे एक फळ आहे ज्याच्या कॅलरीजची संख्या खूप कमी आहे. म्हणून, जेव्हा तुम्ही ते सेवन करता तेव्हा तुम्हाला पोट भरल्यासारखे वाटते परंतु तुमच्या कॅलरीजची संख्या विस्कळीत होत नाही. मधल्या जेवणात पपई खाल्ल्याने तुम्हाला अनहेल्दी स्नॅकिंग टाळण्यास मदत होते. पपईमध्ये आहारातील फायबर चांगल्या प्रमाणात आढळते. ज्यामुळे पपई जास्त काळ पोट भरते. फायबरमुळे, तुम्ही जास्त खाणे टाळता आणि ते कॅलरी सेवन संतुलित करण्यास मदत करते. ज्यामुळे तुमचे वजन कमी करणे सोपे जाते. पपई खाण्याचा एक फायदा म्हणजे त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असते. यामुळे तुम्हाला स्वतः ला हायड्रेट ठेवण्यात मदत होते. तुम्हाला कदाचित हे माहित नसेल, परंतु काहीवेळा तुमचे शरीर भुकेने तहान भागवते आणि यामुळे तुम्हाला जास्त खाणे भाग पडते. म्हणून, जेव्हा तुम्ही पपई खाता तेव्हा ते तुम्हाला हायड्रेटेड राहण्यास मदत करते, त्यामुळे अनावश्यक स्नॅकिंग टाळते.

## पाककला

### कलाकंद

**साहित्य** : २५० ग्रॅम पनीर, २ मोठे चमचे साखर, १ मोठा चमचा मिल्क पावडर, अर्धा चमचा वेलची पूड, कापलेले पिस्ता, गुलाब पाने

कृती : पनीर मिक्सरमध्ये ब्लेंड करा. आता एक पॅन गरम करा आणि त्यात साखर आणि पनीर टाकून चालवा. ५ मिनिट मध्यम आचेवर हालवत रहा. आता वरुन एक मोठा चमचा मिल्क पावडर टाकून चालवा. ५ मिनिटाने वेलची पावडर टाकून चालवा. आता चांगल्यारीत्या मिक्स झाल्यावर एका ताटात पसरवून घ्या. वरुन पिस्ता आणि गुलबाच्या पानांनी सजवून घ्या. गार झाल्यावर कलाकंद सर्व्ह करा.

## वास्तू

### रात्री कपडे धूत असाल तर...

* सूर्यास्तानंतर वातावरणात नकारात्मक शक्तींचा प्रभाव वाढतो. ओल्या कपड्यांमध्ये ही ऊर्जा शोषली जाण्याची शक्यता असते, ज्यामुळे घरात आजारपण किंवा मानसिक तणाव येऊ शकतो.

* या काळात घरात स्वच्छता असावी, पण साचलेले घाण कपडे धुणे किंवा पाण्याचा अतिवापर करणे गरिबीला आमंत्रण देणारे मानले जाते.

## सौंदर्य

बीटरूटच्या सालीची आतील बाजू टाळूवर चोळा. असे केल्याने खाज सुटण्यासोबतच त्वचेच्या मृत पेशीही दूर होतील.

## सल्ला

सिंक मुळे किचनशेल्फ अव्यवस्थित वाटते भांडी ठेवायला त्रास होतो. अशा परिस्थितीत काम करताना सिंकवर लाकडी बोर्ड ठेवा असं केल्याने जागा वाचेल.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, माघ कृष्णपक्ष, चित्रा २६।२९, सूर्योदय ०६ वा. ४१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : शत्रुपक्ष हावी राहील. एखाद्या चुकीला पुन्हा करु नका. मार्ग प्रशस्त होईल. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल.

**वृषभ** : आरोग्यात सुधारणा. आर्थिक स्थितीत बचत आणि निवेशाचे योग येतील. लाभदायी करार होतील.

**मिथुन** : आर्थिक आणि सामाजिक कामांमध्ये अडथळे. कामांची गती मंदावेल. शांत रहा. लाभदायक बातमी कळेल.

**कर्क** : संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. आपल्या महत्वाकांक्षेमुळे यश मिळू शकेल.

**सिंह** : आपली स्थिति, वास्तविकता वाढेल. पारिवारिकदृष्ट्या वेळ सामान्य. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**कन्या** : उत्साह, आत्मविश्वास वाढेल. अडकलेला पैसा मिळेल. खासगी कामाकडे जास्त लक्ष द्याल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. अध्ययनात छान यश.

**तूळ** : अडकलेला पैसा मिळेल. अस्तिक लोकांसाठी शुभ. गैरसमज दूर होतील. व्यर्थ ताण जाणवेल. जबाबदारीची कामे पडतील.

**वृश्चिक** : आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता.

**धनु** : आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. वाहने व यंत्रे जपून चालवावीत.

**मकर** : पाठबळ मिळेल. मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल.

**कुंभ** : आपली दूरदृष्टि आणि बुद्धिने अडकलेली कामे पूर्ण होतील. सामाजिक यश. नवीन कार्य सुरू करू नका.

**मीन** : काळजीपूर्वक काम करा. कोणतेही काम एखाद्यावर विसंबून राहून करू नका. आरोग्य नरम-गरम राहील.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७३६१

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ■ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | ९ | |
| १० | | ११ | ■ | | ■ | १२ | |
| | ■ | १३ | | | १४ | ■ | |
| | ■ | | ■ | १५ | | १६ | ■ |
| ■ | १७ | ■ | १८ | ■ | ■ | १९ | २० |
| २१ | | | | ■ | २२ | | |
| २३ | | ■ | २४ | | | | |

**आडवे शब्द :-** १) तालुक्याचा मुख्य महसूल अधिकारी ७) कोणतेही सामान; शेतातून पिकणारे धान्य ८) तमाशात काम करणारा १०) भांडण सोडविणारे त्रयस्थ मंडळ १२) बारा वर्षांचा काळ; खडतर व्रत १३) ग्रामपंचायतीचा 'मुख्य लोकप्रतिनिधी १५) एक हिंस्र जंगली प्राणी १९) अंगावरील बारीक केस; रोम २१) निष्णात; पटाईत २२) गावाच्या सीमेच्या आतील गावठाणाव्यतिरिक्त सारी जमीन २३) ओळख; वशिला २४) पृथ्वीच्या भोवतालचे हवेचे आवरण

**उभे शब्द :-** १) गरममसाल्यातील एक पदार्थ २) एक प्रकारची मिठाई ३) वाईट सवय; खोड ४) मंगळवेढ्याचे संत ५) उसातील किंवा फळातील द्रव ६) पालीसारखा दिसणार पण मोठा असा एक जीव ९) गेय काव्य; गाणे ११) विजयादशमी १४) चल; जंगम; हेर; खंदक १६) स्त्रियांचे एक वस्त्र १७) लहर; लाट; ऊर्मी १८) मुस्लिम धर्मगुरूने काढलेला हुकूम २०) डाळीचे एक पातळ कालवण २१) बेकरीत तयार होणारा एक पदार्थ २२) महादेव; शंकर

**शब्दगंध क्र. ७३६० चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गु | ल | जा | री | ला | ल | नं | दा |
| ला | ल | ■ | ■ | ख | ■ | दु | ग |
| ब | का | शु | र | ■ | ज | र | ■ |
| ■ | री | स | ■ | रा | म | श्र | ण |
| शो | ■ | र | ग | ■ | वा | र | ■ |
| म | ध | ■ | म | ग | ज | ■ | खा |
| र | म | जा | न | ■ | म | ग | र |
| स | क | ट | ■ | हा | व | र | ट |

**फिल्मीचक्कर क्र. १२२३ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शि | री | नं | ब | र | व | न | ■ |
| दा | ■ | ब | न | ■ | ध | र | म |
| ई | श्व | र | ■ | अ | ■ | म | न |
| ■ | ■ | ■ | अ | नु | रा | ग | ■ |
| ह | म | ■ | ■ | तो | ■ | र | जा |
| म | ■ | सौ | गं | ध | ■ | म | न |
| तु | म | सा | ■ | ■ | मै | ■ | न |
| म | ■ | ल | व | स्टो | री | ■ | ■ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जी व्यक्ती तुमच्या प्रगतीवर जळते तिचा तिरस्कार कधीच करू नका. कारण ती व्यक्ती तुम्हाला उत्कृष्ट समजून तुमच्यावर जळत असते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### भारतातील एकमेव राज्य जे कधीही ब्रिटिशांचे गुलाम बनले नाही?

भारत प्राचीन काळापासून त्याच्या संस्कृती, मुबलक नैसर्गिक संसाधने आणि प्रगत व्यापार व्यवस्थेसाठी जगभरात प्रसिद्ध आहे. या समृद्धीने परदेशी शक्तींचे लक्ष वेधले आणि ब्रिटिश सरकारने हळूहळू संपूर्ण देशावर नियंत्रण मिळवले. २०० वर्षांच्या राजवटीचा देशाच्या बहुतेक भागांवर परिणाम झाला. या काळात समाजातील सर्व घटकांना छळ सहन करावा लागला. ब्रिटिशांनी स्वतःच्या फायद्यासाठी अनेक कठोर कायदे लागू केले आणि समाजाच्या प्रत्येक घटकाला दडपण्याचा प्रयत्न केला. तथापि, असे एक भारतीय राज्य होते ज्याने कधीही ब्रिटिश गुलामगिरी स्वीकारली नाही.

भारतात असे एक राज्य आहे ज्यावर कधीही ब्रिटिश साम्राज्याचे राज्य नव्हते हे जाणून अनेकांना आश्चर्य वाटते. हे राज्य गोवा आहे. खरं तर, पोर्तुगीज लोक ब्रिटिशांच्या खूप आधी भारतात आले. १४९८ मध्ये, वास्को द गामा कालिकतच्या किनाऱ्यावर आले आणि तिथून पोर्तुगीज व्यापार आणि प्रभाव वाढू लागला. ब्रिटिश आणि पोर्तुगीजांमध्ये अनेक संघर्ष झाले, परंतु गोवा कधीही ब्रिटिशांच्या ताब्यात गेला नाही. पोर्तुगीजांनी येथे जवळजवळ ४०० वर्षे राज्य केले, भारतात येणारे पहिले युरोपीय आणि तेथून निघून जाणारे शेवटचे होते. त्यामुळे गोवा ब्रिटिश राजवटीपासून पूर्णपणे अलिप्त राहिला.

भारतात एकूण २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश आहे. लोकसंख्येच्या बाबतीत उत्तर प्रदेश हे भारतातील सर्वात मोठे राज्य आहे, तर क्षेत्रफळाच्या बाबतीत राजस्थान हे सर्वात मोठे राज्य मानले जाते. राजस्थान अंदाजे ३.४२ लाख चौरस किलोमीटर पसरलेले आहे. भारतातील प्रत्येक राज्याची संस्कृती, भाषा आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीमुळे एक वेगळी ओळख आहे. गोवा यापैकी एक अद्वितीय उदाहरण आहे, गोवा हे देखील खास आहे कारण ते देशातील एकमेव राज्य आहे जे कधीही ब्रिटिश गुलामगिरीचा भाग बनले नाही.

### दृढ निश्चय

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक छोटा उंदीर एका गावात राहत होता. तो दिसायला लहान असला तरी त्याचे मन मोठे होते आणि तो अविश्वसनीयपणे धाडसी होता.

त्याच्या आकारमान लहान असूनही, तो नेहमीच साहसी प्रवासात जाण्याचे आणि इतर प्राण्यांसमोर स्वतःला सिद्ध करण्याचे स्वप्न पाहत असे. एके दिवशी, एक क्रूर मांजर गावात आली, ज्यामुळे सर्व प्राणी घाबरून गेले. ते इतके घाबरले होते की अन्न गोळा करण्यासाठी घराबाहेर पडण्यास ते घाबरत होते.

छोट्या उंदीरला माहित होते की त्याला त्याचे मित्र आणि घर वाचवण्यासाठी काहीतरी करावे लागेल. तो आता मांजरीला चकित करण्याचा एक प्लॅन घेऊन आला आणि निघाला. त्याला एक चमकदार घंटा सापडली आणि ती त्याच्या शेपटीला बांधली.

त्यानंतर मांजर झोपलेली असताना तो तिच्या घरात घुसला आणि जोरात घंटा वाजवली.

मांजर घाबरून जागा झाली आणि आवाज ऐकून गावाबाहेर पळून गेली. उंदीरच्या धाडसामुळे, गाव आता इतर प्राण्यांसाठी सुरक्षित झाले होते. इतर प्राणी उंदीरच्या धाडसाने आश्चर्यचकित झाले आणि त्यांचे घर वाचवल्याबद्दल त्याचे आभार मानले. तेव्हापासून, उंदीर गावातील सर्वात धाडसी उंदीर म्हणून ओळखला जाऊ लागला.

तात्पर्य : धाडस आणि दृढनिश्चय असेल तर आपण अनेक संकटांवर विजय मिळवू शकतो.

## जीवन का अमृत (भाग १)



### शिष्टता

१४५. सत्गुरु और ज्यादा उन्नत शिष्यों को छोड़कर, अपने आंतरिक अनुभवों को दूसरों को बताने से, स्वयं का नुकसान होता है और आंतरिक तरक्की में बाधा पड़ती है। इसकी अपनी अहमीयत है। एक अमीर आदमी अपने मेहनत से कमाए धन को छुपाकर रखना चाहेगा, ताकि दूसरों को इसका पता न लगे और वे उससे ईर्ष्या न करने लगें। इसी प्रकार, शिष्य को प्राप्त हुए आध्यात्मिक खजाने का बहुत ध्यान रखना होता है, ताकि यह दूसरों से छुपा रहे और सुरक्षित रहे। जैसे एक छोटे से पौधे को एक पास से गुजरने वाली बकरी भी खा जाती है, पर जब यह बहुत बड़ा पेड़ बन जाता है, तो एक हाथी भी इसे नहीं उखाड़ सकता। इसके अलावा, दूसरों के बुरे विचार भी शिष्य पर बुरा असर डालते हैं । और जो शिष्य से ईर्ष्या करने लगते हैं, वे उसको सही सलाह भी नहीं दे सकते । इस भौतिक संसार का नियम यह माँग करता है कि हर कोई शिष्टता से पेश आए और अपनी असाधारण योग्यताओं का, जो कि उच्चतर मंडलों से संबंधित होती हैं, प्रदर्शन न करें और इसलिए शिष्य को सहनशीलता और नम्रता धारण करने की जरूरत होती है। आप देख सकते हैं कि जो शिष्य अपने अनुभव बताता है या बताती है, वह कई बार गर्व महसूस करने लगता है तथा इस प्रकार अपने अहंकार को हावी होने देता है और फलस्वरूप घमंड का पतन होता है । इन कारणों की वजह से, संतों ने नियम बनाया है, जिसका हर एक को पालन करना होता है, कि शिष्य अपने आंतरिक अनुभवों को कभी भी किसी को न बताए, केवल सत्गुरु को छोड़कर, जो कि इस काबिल है कि वह शिष्य को सही सलाह दे सके।

***

१४६. उसकी इच्छा के प्रति सदा समर्पण की भावना का विकास करो । यह ध्यान-अभ्यास में सहायक होगी।

१४७. भजन-सिमरन में नियमित रूप से समय देने की प्रेमपूर्वक कोशिश करना, वह सर्वोत्तम उपहार है, जो कोई बच्चा अपने सत्गुरु को दे सकता है। मुझे खुशी है कि आप अपने आध्यात्मिक दायित्वों के प्रति पूर्ण रूप से जागरूक हैं। पूरी तरह विकसित और जागृत आध्यात्मिक जिज्ञासु दूसरों के लिए धरोहर है, जो कि प्रेम और सत्य का संदेश, जिंदा महापुरुष की छत्रछाया में, औरों तक पहुँचा सकता है।

वे गिने चुने लोग धन्य हैं, जो अपने कम धन्य भाई-बहनों की आध्यात्मिक जागृति के लिए और उनको सही समझ और विश्वास देने के लिए चुने जाते हैं।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### योग साधना

हम संस्कारों को पावन नहीं बनाते, संस्कार तो अच्छे वा बुरे दोनों ही आत्मा में रेकोर्ड रहते हैं, जब बुद्धि सतोगुणी होती है तो वह सिर्फ अच्छे संस्कारों को बाहर आने देती है। जब बुद्धि तमोगुणी होती है तो वह तामसिक संस्कार बाहर आने देती है।

हिपनोटिज्म में बुद्धि को सुला दिया जाता है और मनुष्य के अवचेतन मन से काम करवाते हैं। नार्को परीक्षण में भी बुद्धि सम्मोहन में चली जाती है और व्यक्ति के अवचेतन में सच क्या है उसका पता लगा लेते हैं। समाधि में भी व्यक्ति सम्मोहन में चला जाता है बुद्धि काम करना बंद कर देती है और अवचेतन मन से कार्य होने लगते हैं। हमें भगवान सामने दिखने लगता है तथा सारे संसार का सिस्टम समझ आने लगता है।

अगर हम बुद्धि को सम्मोहित कर दें या इसे विकसित कर दें तो हम महान बन सकते हैं। सम्मोहन, समाधि या नार्को द्वारा हम थोड़ी देर के लिये बुद्धि को सम्मोहित कर सकते हैं और उस में भी जीवन का रिस्क है।

योग साधना, ज्ञान चर्चा, सेवा से हमारी आत्मा नहीं बुद्धि सतोगुणी बनती है। हमें ऐसी विधियों की खोज करनी है जिस से बुद्धि सहज ही सतोगुणी बन जाये। नव ग्रहों और उपग्रहों का केन्द्र सूर्य है। पृथ्वी का केन्द्र धुव प्रदेश है, परमाणु का शक्ति केन्द्र उस का मध्यवर्ती केन्द्र नाभिक न्यूक्लियस कहलाता है, मस्तिष्क मानवी चेतना का केन्द्र है और उस का मध्य बिंदु आज्ञा चक्र कहलाता है, इस केन्द्र को मस्तिष्क रूपी ताले की चाबी कह सकते हैं। जीवन दुर्ग का प्रवेश द्वार कह सकते हैं।

आज्ञा चक्र की सीध में कपाल के अंदर एक नुकीला सा भाग है। विज्ञान का नियम है कि नुकीले स्थान से विद्युत चुम्बकीय सूक्ष्म तरंगो के संचारण और संग्रहण के लिए उपयोगी है। रेडियो सकेंतो के लिए एरियल एंटीना और आकाशीय विद्युत से विशाल भवनों की रक्षा के लिए लाइटनिंग कंडक्टर इसी सिद्वात पर बनाएं जाते हैं। नुकीले अस्थि स्थान पर शान्ति संचारण और संग्रहण होता है। आंखों से मिले स्केंतों को ले जाने वाले तन्तु इस स्थान पर क्रास कर के, मुड़ कर मस्तिष्क के दृष्टि केन्द्रों की ओर बढ़ जाते हैं। दो आंखों के गोलको में प्राप्त दृश्यों को सिगनल में परिवर्तन यही स्थान करता है। यही स्थान आंखों से प्राप्त दृश्यों को नियंत्रित करता है। ये केन्द्र पिचुटरी ग्रंथि से जुड़ा है। पिचुटरी ग्रन्थि इन सिगनल्स के प्रभाव को शरीर के सभी अंगों तक भेजती है। पिचुटरी ग्रन्थि को अभी कम जाना गया है। उस में अध्यात्म की अपार संभावनाएं हैं। पिचुटरी ग्रन्थि को प्रभावित करके कर्मइन्द्रियों की सक्रियता को समाप्त किया जा सकता है। काम वासना को नष्ट किया जा सकता है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

प्रेयसी - मी माझी पर्स घरी विसरले, मला १००० रुपये हवे आहेत.
प्रियकर - बस यासाठी इतकी हैराण होत आहे... काय तू पण, घे २० रुपये.. आता रिक्षाने घरी जा आणि पर्स घेऊन ये...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कांडल बंदराचे नवीन नाव काय?

– दिनदयाल बंदर

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### तूप

आहारामध्ये तुपाचे नियमित सेवन केल्याने शारीरिक व मानसिक विकास होऊन रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

रोजच्या जेवणात खाण्यासाठी ताजे तूप अधिक गुणकारी व रुचकर असते. त्याच्या सेवनाने शरीराची कांती सुधारते, सुकुमारता वाढते, लहान मुलांची बुद्धी वाढून आकलनशक्ती वाढते.

आजच्या काळात अनेक स्त्रिया शरीराचा बांधा सुडौल ठेवण्यासाठी तूप खाणे टाळतात. परंतु असे वागणे हे अतिशय चुकीचे आहे. यामुळे शरीरात वातप्रकोप, भूक मंद होणे, त्वचेवर कोरडेपणा वाढून त्वचा रुक्ष होणे, वारंवार विसर पडणे, डोळ्यांनी कमी दिसणे, मेंदूचा समतोलपणा ढासळून उतावीळपणा, हळवेपणा, हाता-पायांचा थरकाप अशी अनेक लक्षणे निर्माण होतात. हे सर्व टाळण्यासाठी रोजच्या जेवणात आवर्जून दोन चमचे गायीचे तूप खावे.

आहारामध्ये भाज्यांना फोडणी देण्यासाठी व पोळी बनविताना तेलाचा वापर करण्याऐवजी गायीच्या तुपाचा वापर करणे आरोग्यासाठी हितकारक आहे.

आयुर्वेदामध्ये तूप जितके जुने तितके ते औषध म्हणून जास्त गुणकारी असते, असे सांगितले आहे. शरीरावरील जखमा भरून येण्यासाठी जुने तूप जास्त उपयोगी पडते.

कासे किंवा तांब्याच्या परातीत गायीचे तूप घेऊन त्यात पाणी घालून १०० वेळा फेसावे. ज्या वेळी या तुपाचे स्वरूप फेसल्यामुळे लोण्याप्रमाणे होईल, त्या वेळी त्याला शतधौतघृत असे म्हणतात. हे तूप शरीरावर फोड उठणे, जुन्या जखमा भरून येणे, त्वचेचे रोग, मूळव्याध या विकारांवर मलम म्हणून लावले असता सर्व विकार दूर होतात.

अकरा वर्षांच्या जुन्या तुपाला 'कौमघृत' असे म्हणतात. तर अकराशे वर्षांच्या जुन्या तुपाला 'महाघृत' असे म्हणतात. या तुपापासून अंजन तयार करून ते डोळ्यांत घातले असता निद्रानाश, झटके येणे हे विकार झपाट्याने बरे होतात.

धार्मिक कार्यातही गायीच्या तुपाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सकाळ-संध्याकाळ गायीच्या तुपाचा दिवा देवासमोर लावून ओंकार म्हटल्यास मन:शांती मिळते. त्याचबरोबर या दिव्याने परिसरातील सूक्ष्म जंतूंचा नाश होऊन आरोग्य चांगले राहते. तूप हे दूध व मांसापेक्षा आठपट बलकारक आहे. तसेच तुपाच्या सेवनाने शरीरातील पित्ताचे प्रमाण व्यवस्थित राहून शुक्रधातूचे पोषण होते. त्यामुळे लहान बालके, स्त्रिया, वयोवृद्ध या सर्वांसाठी तूप अत्यंत पोषक आहे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सुनील राऊत यांना सर्वोत्कृष्ट लेखक बक्षीस जाहीर



भिंगार – येथील नाट्य–लघुचित्रपट लेखक, अभिनेते, व्याख्याते, युट्युबर, माळी समाजाचे विश्वस्त सुनील रंजना वनाजी राऊत यांना 'कलावंत दादासाहेब फाळके लघुचित्रपट स्पर्धेत' 'ती आहे म्हणून' लघुचित्रपटाचे सर्वोत्कृष्ट लेखक म्हणून प्रथम क्रमांकाचे बक्षीस जाहीर झाले असल्याचे स्वराज्य फिल्म प्रोडक्शन संघटना, पुणे येथील संस्थापक अध्यक्ष, अभिनेते गिरीश राजुरकर यांनी जाहीर केले.

बक्षीस वितरण शिवजयंती दिनी पुणे येथे अभिनेते डॉ. अमोल कोल्हे, विजय पाटकर, भूषण कडुंसह मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. ती आहे म्हणून या शॉर्ट फिल्मला राष्ट्रवादी काँग्रेस चित्रपट आणि सांस्कृतिक विभाग पुणे आयोजित स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यात द्वितीय क्रमांकाचे बक्षीस अभिनेते मकरंद अनासपुरे ह्यांच्या हस्ते मिळाले आहे. नुकत्याच झालेल्या 'कोहिनूर इंटरनॅशनल शॉर्टफिल्म फेस्टिवल' मध्ये 'ती आहे म्हणून' शॉर्टफिल्मकरिता 'बेस्ट स्टोरी रायटर'चे बक्षिस डोंबिवली (मुंबई) येथे मिळाले आहे.

सदर शॉर्टफिल्मची संकल्पना प्रफुल्ल ज्योती अशोक कार्ले यांची असून नाट्य, चित्रपट अभिनेत्री विद्या सुशीला विश्वंभर जोशी यांनी दिग्दर्शन केले आहे.

या शॉर्टफिल्म मध्ये अंजली साके, ईश्वरी बकरे, कृष्णा वामने, ओम गणगले यांनी भूमिका केली असून ऋषिकेश लटपटे, साहिल मावलकर, प्रभाकर गायकवाड लघुचित्रपटाचा निर्मिती संघ आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## घामाची फुले

संकलन: दिशान फिचर्स




गीतेच्या चौथ्या अध्यायाच्या अनुषंगाने कर्म, विकर्म आणि अकर्म या तीन अवस्थांचे चिंतन घडते तर पाचव्या अध्यायात 'नैष्कर्म्य' अवस्थेचेही वर्णन केले आहे. कर्म म्हणजे बाहेरची स्वधर्माचरणाची स्थूल क्रिया होय. या कर्मात चित्त ओतणे म्हणजे 'विकर्म' होय. म्हणजेच चित्तशोधनासाठी जी कर्मे करावयाची त्यांना गीता 'विकर्म' अशी संज्ञा देते. आपण नमस्काराची क्रिया करतो पण त्या नमस्कारात आतून जर मन विनम्र झाले नसेल तर क्रिया व्यर्थ होय. विनोबाजींनी सुरेख दृष्टांत दिला आहे. शंकराच्या पिंडीवर धार धरून अभिषेक चालला आहे पण चित्त जर अभिषेकामध्ये नसेल, ते जर दुसरीकडेच भरकटत असेल तर अभिषेक घडेल काय ? अभिषेकाच्या जलधारेबरोबर मानसिक चिंतनाची धार अखंड ओतली जात असेल तरच त्या अभिषेकाला किंमत आहे. म्हणजेच चित्त ओतून केलेला अभिषेक हे नुसते अभिषेकाचे कर्म न राहता ते 'विकर्म' ठरेल आणि अशा बाह्य कर्माशी आतून चित्तशुद्धीचे कर्म जोडले गेले तर निष्काम कर्मयोग घडतो.

हृदयातील ओलावा जर बाह्य कर्मात नसेल ते स्वधर्माचरण शुष्क राहील. त्याला निष्कामतेची फळे–फुले येणार नाहीत. अशा कर्मात विकर्म ओतले म्हणजे 'अकर्म' होते. कर्म सहजपणे बाहेर पडते. मुलावर प्रेम करणे, त्याला वाढविणे, पोसणे हे मातेचे सहजकर्म असते. तेच 'अकर्म' होय. माउली ज्ञानदेव म्हणतात,

अगा करितेन वीण कर्म ।
तेचित ते नैष्कर्म्य ।

पुढे–पुढे तर या सहज कर्मातही कर्म करणारा मी आहे असा भावही न ठेवता जे कर्म घडते तेच 'नैष्कर्म्य' होय. कर्म, कर्मातून विकर्म, विकर्मातून अकर्म आणि पुढे नैष्कर्म्य स्थितीला जाणे म्हणजे कर्मातील आनंदाची एकेक पायरी गाठीत कर्मानंदावर आरूढ होणे होय.

खरे तर, कर्म आणि श्रम यातून जीवनवेलीला प्रसन्नतेची फुले लागतात आणि ही श्रमाची फुले नित्य प्रफुल्लित असतात. प्रभूची वाट पाहत प्रभू पूजेसाठी शबरीने आणलेली फुले पाहून रामाने विचारले, 'ही फुले रात्रीच्या वेळीही एवढी प्रफुल्लित कशी?' त्यावर शबरीने दिलेले उत्तर फार उद्बोधक आहे.

ती म्हणाली, 'प्रभू, फार वर्षांपूर्वी इथे मतंग ऋषींचा आश्रम होता. या ऋषींनी पावसाळा सुरू होण्यापूर्वी आश्रमात सरपण आणण्यासाठी साऱ्या शिष्यांना सांगितले पण कुणीच ऐकले नाही. शेवटी वयोवृद्ध ऋषी खांद्यावर कुऱ्हाड टाकून सरपण आणायला निघाले. त्यांच्या पाठोपाठ सारे शिष्यही निघाले. दोन दिवस त्या सर्वांनी भरपूर श्रमदान केले. सरपण तोडताना ते अक्षरशः घामाघूम झाले. त्यांच्या श्रमाचे घाम या भूमीवर पडले आणि त्या घामाच्या बिंदूतून ही फुले जन्माला आली. म्हणून ती नित्य प्रफुल्लित राहिली. श्रमाची फुले नित्य प्रफुल्लित असतात.

– किशोर गांधी

# श्रुती संगीत निकेतनचे संगीत परीक्षांमध्ये उज्वल यश

## डॉ. हृषिकेश कुलकर्णी अलंकार परीक्षा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण



नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या सत्र नोव्हेंबर २०२५ च्या परीक्षांमध्ये श्रुती संगीत निकेतनच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. दंत चिकित्सक आणि विविध संगीत नाटकांमध्ये भूमिका केलेले डॉ. हृषिकेश कुलकर्णी यांनी संगीत अलंकार या परीक्षेमध्ये विशेष प्राविण्यासह यश संपादन केले आहे. याशिवाय इतर परीक्षांमध्ये मृणाल वैद्य, शार्दुल खोल्लम, भार्गवी परदेशी, वैष्णवी पांडे, राजवीर काशीद, आरोही बेडेकर, शौनक कुलकर्णी, संदीप माने हे विद्यार्थी विविध परीक्षांमध्ये केंद्रात प्रथम आले आहेत. परीक्षा निहाय निकाल पुढीलप्रमाणे –



अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या सत्र नोव्हेंबर २०२५ च्या परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या श्रुती संगीत निकेतनच्या विद्यार्थ्यांसह मकरंद खरवंडीकर.

प्रारंभिक : शार्दुल खोल्लम, स्पृहा जहागिरदार, स्वानंदी देशपांडे, अद्वय देशमुख, सुधांशू दुतारे, रेणुका घोडके, मृणाल वैद्य, स्वरा देशपांडे, मुक्ता मुळे, (सर्व विशेष योग्यता), स्वरा धर्माधिकारी (प्रथम श्रेणी)

प्रवेशिका प्रथम : ऋत्विका कुलकर्णी, भार्गवी परदेशी, अलंकृता जगताप, वैष्णवी पांडे अनुज भालेराव, अश्विनी शेळके, श्रीराज कराळे, गिरीश दैतुल (सर्व विशेष योग्यता), पीयूष सानप, वंदना शिरसाठ, वसुधा म्हस्के, ओवी सोनवणे (सर्व प्रथम श्रेणी)

प्रवेशिका पूर्ण : राजवीर काशीद, स्मिता देशमुख (सर्व विशेष योग्यता), सौम्या देशमुख, अन्वय परदेशी, सोहम देशमुख, विशाल काशीद, निर्मिती गवळी, अंजली सांगलीकर, स्वानंदी देशमुख, तन्मय पडोळे, स्वरा चाकूरकर, सान्वी चाकूरकर, शराली काळे, नेहा देवचके (सर्व प्रथम श्रेणी),

मध्यमा प्रथम : आरोही बेडेकर (विशेष योग्यता) वेदांत कुलकर्णी, अनिकेत देऊळगांवकर, सृष्टी काळे, वैष्णवी पटवा, आराध्या गाडळकर (सर्व प्रथम श्रेणी), सुरेश पवार, अलका केळकर, वेदिका सोनसळे, अपूर्वा जोगदे, सोहम भंडारी (सर्व द्वितीय श्रेणी)

विशारद प्रथम : शौनक कुलकर्णी., अलंकार प्रथम : संदीप माने., अलंकार पूर्ण : डॉ. हृषिकेश कुलकर्णी या विद्यार्थ्यांना मकरंद खरवंडीकर, डॉ.धनश्री खरवंडीकर, प्रतीक्षा काळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# आय.एम.एस. ॲकॅडमी ऑफ फाईन ॲण्ड परफॉरमिंग आर्टस्च्या भरतनाट्यम अलंकार परीक्षेचा १००% निकाल

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या अलंकार प्रथम भरतनाट्यम् परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत आय.एम.एस. अकॅडेमी ऑफ फाईन ॲण्ड परफॉरमिंग आर्टस् च्या विद्यार्थिनींनी यश संपादन केले आहे.

आश्लेषा पोतदार, अर्पणा थत्ते, कविता भांबरे, गौरी ठाणेकर आणि सिद्धी गांधी या विद्यार्थिनी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाल्या आहेत.

ही अकॅडेमीची पहिलीच बॅच असून, पहिल्याच प्रयत्नात मिळालेले हे यश संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची साक्ष देणारे आहे. अलंकार ही परफॉरमिंग आर्टस् क्षेत्रातील सर्वोच्च परीक्षा मानली जाते.

या विद्यार्थिनींनी गुरु स्वातीताई दैठणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गौरी बुरुडे यांच्या साहाय्याने या परीक्षेची तयारी केली.

आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम नृत्य कलाकार आणि संशोधिका म्हणून स्वातीताई प्रसिद्ध असून त्यांच्या नृत्ययोग प्रबंधा वर आधारित चार वर्षांचा डिग्री कोर्स डॉ. डी.वाय. पाटील युनिव्हर्सिटीमध्ये सुरू झाला असून हा सन्मान मिळालेला. त्या भारतातील पहिल्या शास्त्रीय नृत्यांगना ठरल्या आहेत. अशा सल्लागार आणि गुरू आय एम एस संस्थेला लाभल्या आहेत आणि त्यांचे मार्गदर्शन आयएमएसच्या विद्यार्थ्यांना मिळत आहे, ही नक्कीच अहिल्यानगरसाठी अभिमानाची गोष्ट आहे.



आय.एम.एस. ॲकॅडमी ऑफ फाईन ॲण्ड परफॉरमिंग आर्टस्च्या भरतानाट्यम अलंकार परीक्षेत यशस्वी झालेले आयएमसचे विद्यार्थी.

संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता, संचालक डॉ. विक्रम बार्नबस, अॅकॅडमीच्या समन्वयक डॉ. ऋचा तांदुळवाडकर आणि प्राचार्या सौ. चैत्राली पांडे यांनी विद्यार्थिनींचे कौतुक केले आहे.

आय.एम.एस. अकॅडेमी ऑफ फाईन ॲण्ड परफॉरमिंग आर्टस् गेल्या २४ वर्षांपासून परफॉरमिंग आर्टस् क्षेत्रात दर्जेदार प्रशिक्षण देत आहे. संस्थेत भरतनाट्यम्, कथक आणि तबला या शास्त्रीय कलांचे सखोल आणि शिस्तबद्ध शिक्षण दिले जाते. कला जोपासतानाच विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि व्यासपीठावरील सादरीकरणाची तयारी करून देणे, हे संस्थेचे वैशिष्ट्य आहे.

पुढील बॅचसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी डॉ. ऋचा तांदुळवाडकर यांच्याशी ९८५०३७०१४१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.






नृत्य, संस्कृती आणि शिस्तीचा सुरेल संगम असलेला नृत्यसाज भरतनाट्यम् डान्स ॲकॅडमीचा वार्षिक नृत्योत्सव २०२६ व अकॅडमीचा नववा वर्धापन दिन १ फेब्रुवारी रोजी चौंडेश्वरीमाता मंदिर, भिंगार येथे उत्साहात झाला. या कार्यक्रमात अकॅडमीतील विद्यार्थिनींनी सादर केलेल्या भरतनाट्यम् नृत्याविष्कारांनी उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले.

# नृत्यसाज भरतनाट्यम् डान्स ॲकॅडमीचा वार्षिक नृत्योत्सव २०२६ उत्साहात

नगर – नृत्य, संस्कृती आणि शिस्तीचा सुरेल संगम असलेला नृत्यसाज भरतनाट्यम् डान्स अकॅडमीचा वार्षिक नृत्योत्सव २०२६ व अकॅडमीचा नववा वर्धापन दिन १ फेब्रुवारी रोजी चौंडेश्वरीमाता मंदिर, भिंगार येथे उत्साहात झाला. या कार्यक्रमात अकॅडमीतील विद्यार्थिनींनी सादर केलेल्या भरतनाट्यम् नृत्याविष्कारांनी उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून कु. उत्कर्षा दगडे (संचालिका – उत्कर्षाज् स्कूल ऑफ कथ्थक) व डॉ. अर्चना आघाव नागरे (स्त्रीरोग तज्ज्ञ, सैनिक फेडरेशन, महाराष्ट्र राज्य महिला अध्यक्ष) यांनी उपस्थिती दर्शवली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्याचे सूत्रसंचालन कु. आश्लेषा अविनाश पोतदार यांनी केले.


विद्यार्थिनींनी सादर केलेल्या भावपूर्ण मुद्राभिनय, लयबद्ध पदन्यास व शास्त्रीय सौंदर्याने नृत्यरसिकांची मने जिंकली. प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. हा कार्यक्रम नृत्यसंस्कृती जपणारा व नव्या कलाकारांना व्यासपीठ देणारा ठरला, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

यावेळी कु. अश्लेषा पोतदार यांनी सांगितले की, नृत्य हे केवळ कला नसून ते शिस्त, संस्कार आणि आत्मविश्वास घडवणारे माध्यम आहे. भरतनाट्यम्सारख्या शास्त्रीय नृत्यातून विद्यार्थिनींमध्ये संयम, समर्पण आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक होते. नृत्यसाज अॅकॅडमीच्या माध्यमातून नव्या पिढीला आपल्या परंपरेशी जोडण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

यावेळी डॉ. अर्चना आघाव नागरे म्हणाल्या की, नृत्य हे केवळ कला नसून ते उत्तम आरोग्याचे प्रभावी साधन आहे. नियमित नृत्यामुळे शरीर तंदुरुस्त राहते, मन प्रसन्न होते आणि तणाव कमी होतो. आजच्या धकाधकीच्या जीवनात नृत्यासारखी सर्जनशील क्रिया प्रत्येकाने आपल्या दिनचर्येत समाविष्ट केली पाहिजे.

अविनाश पोतदार यांनी आभार मानले.

# चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



नगर – चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. यावर्षीच्या कार्यक्रमाची संकल्पना रूटस् ऑफ भारत अशी होती. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. ज्ञानेश कुलकर्णी, भूषण देशमुख आणि संजय सपकाळ उपस्थित होते. तसेच संचालक संजय चव्हाण, सीईओ अशोक सचदेव यांच्या प्रमुख उपस्थितीत सोहळा पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक गणेश आरतीने करण्यात आली. त्यानंतर शाळेच्या शिक्षिका रेवती पागा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कविता व कथांचे अक्षरलेणी या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेली नृत्य सादरीकरणे, लघुनाट्य, रामायणावर आधारित नृत्यनाट्य तसेच फोक डान्स यांनी उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले सुंदर योगा नृत्य विशेष आकर्षण ठरले. या योगा नृत्यासाठी मार्गदर्शन क्रीडा शिक्षक ऋषिकेश घोडेकर यांनी केले. या सर्व सादरीकरणांतून भारताची मुळे ही संकल्पना प्रभावीपणे मांडण्यात आली.

शैक्षणिक व सहशैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. संपूर्ण कार्यक्रम भारतीय संस्कृती, परंपरा व मूल्यांचे दर्शन घडवणारा ठरला. उपस्थित पालक व पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले.

सूत्रसंचालन रेणुका मुळे यांनी केले. त्यांना इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी श्रद्धा गौड व पायल राऊत यांनी उत्तम साथ दिली. कार्यक्रमाचा समारोप इयत्ता सहावीची विद्यार्थिनी आलिया खाटीक हिने प्रभावी शब्दांत आभारप्रदर्शन करून केला. कार्यक्रम सांस्कृतिक विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नावरील रास्ता रोको आंदोलनप्रकरणी खा.निलेश लंकेंसह १२ जण न्यायालयाकडून निर्दोष मुक्त



नगर – सन २०२३ मध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी नगर–पुणे महामार्गावर सुपा चौक येथे करण्यात आलेल्या रस्ता रोको आंदोलनप्रकरणी विद्यमान खासदार नीलेश लंके यांच्यासह सर्व १२ आरोपींची नगर येथील न्यायालयाने पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे.

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी मा. जी. जी. सोनी यांनी दिलेल्या निर्णयानुसार, आरोपींविरोधात दाखल करण्यात आलेले भारतीय दंड संहितेचे कलम ३४१ व १८८, राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ चे कलम ८ (ब) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये कलम १३५ अंतर्गतचे आरोप संशयमुक्त पुराव्यांद्वारे सिद्ध होऊ शकलेले नाहीत. न्यायालयाने नमूद केले की, आंदोलनादरम्यान कोणालाही इजा झाल्याचा अथवा सार्वजनिक शांततेला बाधा निर्माण झाल्याचा कोणताही ठोस पुरावा सादर करण्यात आलेला नाही. तसेच घटनास्थळी उपलब्ध असलेले स्वतंत्र व स्थानिक साक्षीदार तपासले गेले नसल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आले.

खासदार निलेश लंके च्या वतीने ॲड. परिमल फळे यांच्याकडून करण्यात आलेल्या युक्तिवादानुसार, जिल्हादंडाधिकाऱ्यांच्या आदेशाची कायदेशीर प्रसिद्धी झाल्याचा कोणताही पुरावा प्रकरणात सादर करण्यात आलेला नव्हता. तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९५ ची पूर्तता न करता भारतीय दंड संहिता कलम १८८ अंतर्गत आरोप ठेवणे कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य धरता येत नसल्याचे न्यायालयाने मान्य केले. ॲड. फळे यांना ॲड. राहुल झावरे, ॲड. शुभम राजुरकर, अंड. साक्षी जाधव, ॲड. आनंद कुलकर्णी, ॲड. निखिल मुसळे, ॲड. प्रतीक ढमढेरे, ॲड. आकाश पवार यांनी सहाय्य केले.

सर्व पुराव्यांचे सखोल अवलोकन करून न्यायालयाने स्पष्ट केले की, अपूर्ण व कमकुवत पुराव्यांच्या आधारे आरोपींना दोषी ठरविणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे आरोपी क्र. १ ते १२ यांची निर्दोष मुक्तता करण्यात येत असून, सर्व आरोपींची बंधपत्रे रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.





चास येथील श्री नृसिंह विद्यालयात झालेल्या स्पर्धांचे उद्घाटन उपशिक्षक विजय देवकर यांच्या हस्ते झाले. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे आदी. शेजारील छायाचित्रात चुरशीने लढला गेलेला कबड्डीचा सामना.

# मेरा युवा भारत व श्री नवनाथ युवा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने क्रीडा स्पर्धा उत्साहात

## तालुक्यातील युवक–युवतींचा सहभाग, विजेते संघ व खेळाडूंची जिल्हास्तरावर निवड

नगर – युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकारच्या 'मेरा युवा भारत' उपक्रमांतर्गत आणि श्री नवनाथ युवा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने नगर तालुक्यातील निमगाव वाघा (ता. नगर), चास व हिंगणगाव या ठिकाणी तालुकास्तरीय विविध क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांमध्ये शालेय विद्यार्थ्यांसह महाविद्यालयीन युवक–युवतींनी सहभाग नोंदविला. खो–खो, कबड्डी, हॉलीबॉल, गोळाफेक, धावणे आदी मैदानी स्पर्धांनी परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले होते.

चास येथील श्री नृसिंह विद्यालयात झालेल्या स्पर्धांचे उद्घाटन उपशिक्षक विजय देवकर यांच्या हस्ते झाले. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, आशिष आचारी, आप्पासाहेब कदम, युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे, दिपक ठाणगे आदींसह शालेय शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. निमगाव वाघा येथील नवनाथ विद्यालयात आयोजित स्पर्धांचे उद्घाटन मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांच्या हस्ते झाले असून, याच वेळी विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना बक्षीस वितरण करण्यात आले. हिंगणगाव येथे एव्हरेस्ट करिअर अॅकॅडमीमध्ये झालेल्या स्पर्धांचे उद्घाटन पोपट सोनवणे यांच्या हस्ते पार पडले.

स्पर्धांदरम्यान खो–खो, कबड्डी, गोळा फेक व धावणे या प्रकारांमध्ये चुरशीच्या लढती रंगल्या. विजयी व उपविजयी संघ तसेच वैयक्तिक खेळाडूंना स्मृतीचिन्हे, मेडल व प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले. या स्पर्धांमधून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेते संघ आणि खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

यावेळी बोलताना पै. नाना डोंगरे यांनी सांगितले की, निरोगी व सुदृढ आयुष्यासाठी मैदानाकडे वळणे अत्यंत गरजेचे आहे. शरीर संपदा हीच खरी संपत्ती असून, दररोज किमान काही वेळ मैदानी खेळ खेळले पाहिजेत. विद्यार्थ्यांनी शालेय पातळीवर विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या संपूर्ण उपक्रमाचे आयोजन 'मेरा युवा भारत'चे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी रमेश गाडगे यांच्यासह आयोजक, शिक्षक व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# नैसर्गिक घटकांपासून तयार सॅनिटरी नॅपकिन आरोग्यासाठी सुरक्षित

## ॲड. महेश शिंदे यांचे प्रतिपादन; जय युवा अकॅडमीच्या वतीने युवतींना मासिक पाळीविषयक स्वच्छता व आरोग्य संदर्भात जागृती



मेरा युवा भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय, मोगा ग्रुप ऑफ कंपनीज, जय युवा अकॅडमी व माहेर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य मार्गदर्शन कार्यक्रमात सहभागी झझेल्या युवती.

नगर – नैसर्गिक घटकांपासून तयार करण्यात आलेले आयुर्वेदिक सॅनिटरी नॅपकिन महिलांच्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त असून, त्वचेची काळजी घेणारे, दुर्गंधीपासून मुक्तता देणारे, त्वरित आरामदायी तसेच पर्यावरणपूरक असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने महिलांनी व किशोरवयीन मुलींनी अशा आयुर्वेदिक नॅपकिनचा वापर करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जय युवा अकॅडमीचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे यांनी केले.

मेरा युवा भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय, मोगा ग्रुप ऑफ कंपनीज, जय युवा अकॅडमी व माहेर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवतींसाठी मोफत आरोग्य मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. हे शिबिर डॉ. ना. ज. पाऊलबुद्धे फार्मसी महाविद्यालय तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, निर्मलनगर येथे पार पडले.

पुढे ॲड. शिंदे पुढे म्हणाले की, आज बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक सॅनिटरी नॅपकिनमध्ये प्लास्टिक व केमिकलयुक्त घटकांचा वापर केला जातो. त्यामुळे महिलांमध्ये त्वचारोग, संसर्ग, दुर्गंधी तसेच दीर्घकालीन आजारांचा धोका वाढत आहे. यावर उपाय म्हणून नैसर्गिक व आयुर्वेदिक घटकांपासून तयार करण्यात आलेले सॅनिटरी नॅपकिन वापरणे काळाची गरज बनली आहे.

या शिबिरात सोशल वर्कर हेमलता कांबळे यांनी महाविद्यालयीन युवती व किशोरवयीन मुलींना आपल्या आरोग्याबाबत सजग राहण्याचे आवाहन केले. प्लास्टिक व रासायनिक घटक असलेले सॅनिटरी नॅपकिन धोकादायक असून त्यामुळे महिलांना अनेक गंभीर आजारांना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी आयुर्वेदिक सॅनिटरी नॅपकिनच्या वापराबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण दिले.

मार्गदर्शक सुरेखा ढोंन्नर यांनी मुलींनी आपल्या आरोग्यविषयक समस्यांबाबत आई, शिक्षिका व विश्वासू व्यक्तींशी मनमोकळेपणाने चर्चा केली पाहिजे. संवादाची भीती बाळगल्यास समस्या गंभीर स्वरूप धारण करू शकतात, असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमास प्राचार्य अनुराधा चव्हाण, मुख्याध्यापिका विजया नवले, हेमलता कांबळे, दिपाली उदमले, सारिका कोकाटे, माहेर फाउंडेशनच्या रंजनीताई ताठे, प्रियंका नगरकर, गीता वामन, मनीषा शिंदे, सुरेखा ढोंन्नर, शिक्षिका पौर्णिमा साळुंखे, प्रतिभा शिंदे आदी मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या.

या आरोग्य मार्गदर्शन शिबिरामुळे युवती व किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळीविषयक स्वच्छता, आरोग्य जपणूक व सुरक्षित सॅनिटरी नॅपकिन वापराबाबत मोठ्या प्रमाणात जागृती करण्यात आली. शिबिर यशस्वी करण्यासाठी ॲड. गायत्री गुंड, ॲड. आरती शिंदे व जय युवाच्या संचालिका जयश्री शिंदे यांनी परिश्रम घेतले.

# राधाबाई काळे महिला महाविद्यालयात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' कार्यशाळा



राधाबाई काळे महिला महाविद्यालयात संगणक विभागाच्या वतीने आर्टिफिशल इंटेलिजन्स या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा पार पडली.

नगर – राधाबाई काळे महिला महाविद्यालयात संगणक विभागाच्या वतीने आर्टिफिशल इंटेलिजन्स या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना रोबोटिक्स, हवामान अंदाज, औद्योगिक व वैद्यकीय क्षेत्रातील एआयच्या वाढत्या वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या आर्टिफिशल इंटेलिजन्स कार्यशाळेचे आयोजन संगणक विभागप्रमुख प्रा. अनुप शिंदे यांनी केले होते. सदर कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर थोपटे यांनी शुभेच्छा दिल्या. ए. आय. कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शन पुणे येथील सिमु सॉफ्ट कंपनीचे तज्ञ शोएब मुलानी व यश चव्हाण यांनी केले.

श्री. मुलानी यांनी आर्टिफिशल इंटेलिजन्स मध्ये प्रोग्रामिंग व इलेक्ट्रॉनिक डिवाइस याची जोडणी कशी करावी व त्यामध्ये कसा कोड द्यावा याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

तसेच श्री. चव्हाण यांनी आरडीनो, ईएसपी, रासबेरी किट तसेच पायथॉन प्रोग्रामिंग याचे प्रात्यक्षिक दाखवून सखोल मार्गदर्शन केले. तसेच विविध कंपन्यांमध्ये रोबोटिक्स कसा वापर केला जातो, याची माहिती दिली. ऊन, वारा व पावसाचा अचूक अंदाज वर्तवण्यासाठी हवामान खात्याकडून आर्टिफिशल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर कसा केला जातो या संदर्भात उदाहरणाद्वारे स्पष्ट केले.

कार्यशाळेच्या कार्यक्रम अध्यक्षस्थानी डॉ. भूपेंद्र निकाळजे होते. त्यांनी दैनंदिन जीवनात ए.आय. चा होत असलेला वापर आणि भविष्यातील संधी या संदर्भात मार्गदर्शन केले.

कार्यशाळेसाठी प्रा. श्रीमती प्रतीक्षा धामणे, प्रा. श्रीमती नम्रता देठे व प्रा. आकांक्षा पवार यांच्यासह महाविद्यालयातील बी बी ए (सी.ए) विभागाच्या विद्यार्थिनी व सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

प्रास्ताविक अनुप शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती नम्रता देठे यांनी केले. श्रीमती प्रतीक्षा धामणे यांनी आभार मानले.



सिद्धी पॅरामेडिकल येथे कर्करोग जनजागृतीसाठी नाटिका व पोस्टर प्रेझेंटेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# सिद्धी पॅरामेडिकल येथे कर्करोग जनजागृतीपर उपक्रम

नगर – जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून सिद्धी पॅरामेडिकल येथे विद्यार्थ्यांच्या वतीने कर्करोग जनजागृतीसाठी नाटिका व पोस्टर प्रेझेंटेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपक्रमाचा मुख्य उद्देश समाजामध्ये कर्करोगाबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाटिकेतून कर्करोगाची कारणे, लक्षणे, प्रतिबंधक उपाय तसेच वेळेवर तपासणीचे महत्त्व प्रभावीपणे मांडण्यात आले. तसेच पोस्टर प्रेझेंटेशनद्वारे कर्करोग प्रतिबंध, आरोग्यदायी जीवनशैली आणि उपचाराबाबत महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली.

कार्यक्रमास डॉ. राहुल सालालकर, महेश जोशी, विजय लोखंडे, ओम लगड, वैष्णवी सालालकर, राहुल लुंकड व विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. राहुल सालालकर यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडतो, असे मत व्यक्त केले. डॉ. हरीष लुंकड यांनी आभार मानले.

# प्रत्येकाने नित्यनेमाने आरोग्याची तपासणी करणे आवश्यक

## डॉ. ज्ञानेश्वर फुसे यांचे प्रतिपादन; संजय नाना सत्रे सोशल फाउंडेशन, सिटी केअर हॉस्पिटल आयोजित सर्व रोग निदान शिबिराला प्रतिसाद



ताठेमळा येथील गुरुदत्त उद्यानामध्ये संजय सत्रे नाना सोशल फाउंडेशन, सिटी केअर हॉस्पिटल व भुतकरवाडी येथील श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – पूर्वी वयाच्या चाळीशी नंतर आरोग्याची तपासणी करणे गरजेचे होते. परंतु बदलत्या जीवनशैलीमुळे आता कमी वयातही मोठ्या प्रमाणात आजार होऊ शकतात. यामुळे आरोग्य विषयी जनजागृती होणे आवश्यक आहे. या शिबिराच्या माध्यमातून हाडांची कॅल्शियमची तपासणी, नेत्र तपासणी, ब्लड प्रेशर व शुगर तपासणी करण्यात येणार आहे. प्रत्येकाने नित्यनेमाने आरोग्याची तपासणी करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ.ज्ञानेश्वर फुसे यांनी केले आहे.

ताठेमळा येथील गुरुदत्त उद्यानामध्ये संजय सत्रे नाना सोशल फाउंडेशन, सिटी केअर हॉस्पिटल व भुतकरवाडी येथील श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ.रणजित सत्रे, सिटीकेअर हॉस्पिटलचे संचालक डॉ.संदीप सुराणा, माजी महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती डॉ.योगिता सत्रे, नगरसेविका पुष्पाताई बोरुडे, वंदनाताई ताठे, वर्षाताई सानप, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भीमाशंकर लांडे, उपाध्यक्ष विलास ताठे, कार्याध्यक्ष संभाजी काळे, सचिव आप्पा बेद्रे, खजिनदार विश्वनाथ जाधव, डॉ.चैत्राली सारडा, डॉ.ज्ञानेश्वर फुसे, डॉ.खन्ना, डॉ.किरण कर्डिले, डॉ.कारखीले, डॉ.शंकर आहुजा, सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, विशाल गणेश देवस्थानचे प्रा.माणिक विधाते, विनोद पुंड, राजेंद्र पडोळे, कॅप्टन सुधीर पुंड, चंद्रकांत पुंड, अनिल इवळे, रोहित पठारे, अभिजीत बोरुडे, किरण पंधाडे, ओंकारेश्वर झावरे, रमेश चिपाडे, पोपट शिंदे, गणेश कोल्हे, फाउंडेशनचे ब्रिजेस ताठे, दीपक खेडकर, निलेश सत्रे, शितल सोनवणे, योगेश भुजबळ, भाऊसाहेब भगत, महेश ताठे, संकेत ताठे, शैलेश सत्रे, सचिन जगताप, निखिल ताठे, ऋषिकेश ताठे, शंकर आढाव, अतुल पडोळे, अनुराग पडोळे आदी उपस्थित होते.

भीमाशंकर लांडे म्हणाले, ज्येष्ठ नागरिकांसाठी वेळोवेळी विविध आरोग्य शिबिरांच्या आयोजन करण्यात येते. आरोग्याची तपासणी वेळेवर केल्यास उपचार करणे सोपे होते. सध्या औषधाचा खर्च न परवडणारा असल्याने आरोग्य शिबिरांची गरज आहे.

डॉ.संदीप सुराणा म्हणाले, ज्येष्ठ नागरिकांनी हाडांची कॅल्शियमची तपासणी करणे गरजेचे आहे. गुडघेदुखी, कंबरदुखी यासारखे आजार हाडांच्या कॅल्शियम कमी झाल्यामुळे जाणवतात. ज्येष्ठ नागरिकांनी वेळेच्या वेळी तपासणी करणे आवश्यक आहे.

# योग्य वेळी निदान व उपचार केल्यास कॅन्सर पूर्णपणे बरा होऊ शकतो

### जायंट्स ग्रुपचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे

नगर – कॅन्सरचे योग्य वेळी निदान व उपचार झाले, तर कर्करोग पूर्णपणे बरा होऊ शकतो. साधारणतः ४० टक्के कर्करोग हे तंबाखू व तत्सम व्यसनांमुळे होत असून, यावर नियंत्रण मिळवण्यासाठी समाजात जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन जायंट्स ग्रुपचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांनी केले. कर्करोगाचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी नागरिकांनी आरोग्याबाबत सजग राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर, महापालिकेचे जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्र आणि अजय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कर्करोग (कॅन्सर) जनजागृती सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. महानगरपालिकेच्या जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित या कार्यक्रमात नागरिकांना कर्करोगाविषयी माहिती देण्यात आली.

या जनजागृती सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी कर्करोग तज्ज्ञ डॉ. सतीश सोनवणे लिखित कॅन्सरविषयक माहितीपूर्ण पुस्तकांचे नागरिकांना वाटप करण्यात आले. कर्करोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, वेळेवर तपासणीचे महत्त्व आणि उपचार पद्धती याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

### जागतिक कर्करोग जनजागृती सप्ताहाचा अहिल्यानगरमध्ये उत्साहात शुभारंभ



जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर, महापालिकेचे जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्र आणि अजय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कर्करोग (कॅन्सर) जनजागृती सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला.

अजय फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती विद्या तन्वर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, माझ्या पतींचे निधन कॅन्सरमुळे झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ कॅन्सरविरोधी जनजागृतीचे कार्य अविरतपणे सुरू ठेवले आहे. स्वतःच्या आयुष्यातील अनुभव इतरांना या संकटातून मार्ग काढण्यासाठी प्रेरणादायी ठरावेत, हा आमचा उद्देश आहे. कॅन्सर रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक आधार देण्याचे कार्यही फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला महापालिका आरोग्य विभागाच्या डॉ. सौ. आयेशा शेख, रीना पवार, सौ. नूतन गुगळे, जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सचिव अमित मुनोत, अनिल गांधी, अभय मुथा, डॉ. विनय शहा, तसेच जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सिस्टर मनोरमा थोरात, माला साळवे, ज्योती तिवारी, सुरेखा डिके, रेखा गावंडे, आशा तांबे, दिक्षा पगारे, आशा सेविका अनिता तिवारी, प्रिया इंगळे, दुर्गा चंद्रे, पल्लवी बिडकर, निर्मला राठौर, सोनाली पालवे, अंजू रासकर, विद्या फुलसौंदर, प्रभाग समिती क्रमांक ४ मधील महिला कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते.



सारडा महाविद्यालयातील कनिष्ठ लिपिक सौ. भाग्यश्री कुलकर्णी यांना उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार प्रदान करताना रजिस्ट्रार अशोक असेरी आदी.

# उत्कृष्टपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा 'सारडा कॉलेज' नेहमीच सन्मान करते

### रजिस्ट्रार अशोक असेरी यांचे प्रतिपादन

नगर – हिंद सेवा मंडळाचे पेमराज सारडा महाविद्यालयात नुकतेच विद्यार्थ्यांसाठी स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देण्याचे काम महाविद्यालयाच्या माध्यमातून नेहमी केले जाते. प्रत्येक विद्यार्थी हा महाविद्यालयाचा केंद्रबिंदू असून महाविद्यालयातील प्रत्येक कर्मचारी विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन करण्याचे काम आपापल्या परीने करत असतात. कामाच्या माध्यमातून समाजात वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न कर्मचारी करत असतात. महाविद्यालय नेहमीच उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहते, असे गौरवोद्गार नुकतेच महाविद्यालयातील परीक्षा विभागात काम करणाऱ्या कनिष्ठ लिपिक सौ. भाग्यश्री कुलकर्णी यांना उत्कृष्ट कर्मचारी म्हणून महाविद्यालयाच्या वतीने पुरस्कार देण्यात आला, त्या प्रसंगी महाविद्यालयाचे रजिस्ट्रार अशोक असेरी यांनी काढले. त्यानिमित्त महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या वतीने सौ. कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

सौ. कुलकर्णी यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की, मला महाविद्यालयाचे काम करत असताना नेहमी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळत असते. त्यामुळे प्रत्येक कामात येणाऱ्या समस्या सोडवताना अडचणी येत नाहीत. त्यांच्या या पुरस्काराबद्दल हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. रमेश झरकर, ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित आदींनी त्यांचे कौतुक केले.

सदर कार्यक्रमास सौ. भारती वायाळ, शिवाजी भडके, अतुल सामल, वसंत शिंदे, कार्तिक चौव्हाण, ओमकार वाघमारे, बाजीराव माळी, अभिषेक देशपांडे, शबाना बागवान, सौ. सुचिता तांबोळी, सौ. रेखा कवळे, श्रीमती शीतल नायकु, योगेश कुलकर्णी, अजय सुरवसे, बाळू नागापुरे आदी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

पेमराज सारडा महाविद्यालय कर्मचारी समिती सदस्य ओमकार वाघमारे यांनी आभार मानले.

# पांडुरंगाच्या सेवेत दर्शनाचा अलौकिक अनुभव

## आदिनाथ जोशी यांचे प्रतिपादन; अर्बन बँक कॉलनीतील विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचा वर्धापन दिन साजरा



नगर – छत्रपती संभाजीनगर रोडवरील अर्बन बँक कॉलनीतील हौशी विठोबा मंदिराचा २९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी जोशी परिवाराच्या वतीने महाआरती करण्यात आली. (छाया – विजय मते)

नगर – पांडुरंगाच्या सेवेमुळे विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनाचा अलौकिक, समाधानकारक व अविस्मरणीय अनुभव जोशी परिवाराला प्राप्त झाला असून, हा अनुभव केवळ एका कुटुंबापुरता मर्यादित नसून संपूर्ण समाजाला भक्तीच्या मार्गावर नेणारा आहे, असे भावनिक व विचारप्रवर्तक प्रतिपादन विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे आदिनाथ जोशी यांनी केले. सेवा, श्रद्धा आणि निष्ठा या त्रिसूत्रीवर पांडुरंगाची भक्ती उभी आहे. अहंकार न ठेवता, निस्वार्थ भावनेने केलेली सेवा हीच खरी उपासना आहे. विठ्ठल आपल्या प्रत्येक सेवकावर कृपादृष्टी ठेवतो. या मंदिराच्या माध्यमातून भाविकांना शांतता, समाधान आणि सकारात्मक ऊर्जा मिळावी, हाच आमचा उद्देश आहे. पिढ्यान्पिढ्या चालत आलेली वारीची परंपरा, वारकऱ्यांची निस्वार्थ सेवा आणि विठ्ठलनामाचा गजर यामुळेच समाज अधिक सुसंस्कृत, एकसंध व संस्कारक्षम राहतो, असेही ते यावेळी म्हणाले.

छत्रपती संभाजीनगर रोडवरील अर्बन बँक कॉलनीतील हौशी विठोबा मंदिरात विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन भाविकांना घडते. दर एकादशीला येथे भाविकांची गर्दी होत असून, आषाढी वारीच्या काळात दिंड्यांमधील वारकरी या ठिकाणी येऊन भक्तिभावाने सेवा करतात. या मंदिराचा २९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त पहाटे श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीला विधिवत रुद्राभिषेक करण्यात आला.

सायंकाळी मंदिर परिसरात फुलांची मनोहारी सजावट करण्यात आली होती. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेला. यावेळी झालेल्या महाआरतीला भाविकांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला.

कार्यक्रमात पाचवीत शिक्षण घेणारी स्वानंदी तुषार देशमुख हिने विठ्ठल-रुक्मिणी वरील अभंग व भक्तिगीते सादर करून उपस्थित भाविकांना भक्तिरसात चिंब केले. तिच्या सुरेल गायनाने कार्यक्रमात विशेष रंगत आली असून, उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात तिचे कौतुक केले.

या प्रसंगी श्री व सौ.प्रज्ञा अभिजीत जोशी, भार्गव जोशी, माजी नगरसेविका संगीता खरमाळे यांच्यासह परिसरातील नागरिक व भाविक उपस्थित होते. मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त सौ. आश्विनी राजेश, अध्यापक, स्मिता आशिष ब्रह्मे, अजय घोलप आदींच्या वतीने भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला.

कार्यक्रमास नगरसेवक निखिल वारे, नगरसेविका वर्षा सानप, रोहन सानप, अमोल गाडे, राधाकिसन देशमुख, प्रशांत खांडेकर, अभय देशपांडे, मकरंद भट, पुरुषोत्तम जोशी, प्रवीण राजापूरकर, सौ. स्मिता रणदिवे, संस्थान सौ. शुभांगी निंबाळकर आर्दीनी उपस्थित राहून विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले.

विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात, भक्तिभाव, सेवा आणि आनंदोत्सवाच्या वातावरणात मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी प्रवीण डोक्रस, गणेश भालेराव, प्रणव रेखी, शहाजी पांडुळे, संदीप यादव, सचिन गाडे, राजू कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले. अभिजीत जोशी यांनी आभार मानले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## धार्मिक होते का?

निएंडरथल मानवांनी त्यांच्या गूढ जीवनाबद्दल अनेक संकेत मागे सोडले आहेत. परंतु, त्यांच्या आध्यात्मिक बाजूबद्दल फार कमी माहिती उपलब्ध आहे. काही पुरातत्त्वशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञांना असे वाटते की, हे आदिमानव, जे ३०,००० वर्षांपूर्वी नामशेष झाले, त्यांनी काही विधिवत किंवा पवित्र क्रियाकलापांमध्ये भाग घेतला असावा.



निएंडरथलने केलेल्या अनेक कृती त्यांच्या धार्मिक किंवा प्रतीकात्मक विचारसरणीकडे निर्देश करतात : निएंडरथल त्यांचे मृतदेह पुरत होते, हे आपल्याला माहीत आहे. त्यांनी गुंफामध्ये प्रतीकात्मक हेतूसाठी प्राण्यांच्या कवटी जमा केल्या होत्या. त्यांनी गुंफामध्ये शैलकला तयार केली. त्यांनी अस्वलाच्या हाडांवर प्रतीकात्मक रेखाचित्रे कोरली. त्यांनी पक्ष्यांची पिसे काढली, कदाचित सजावटीसाठी त्यांचा वापर करण्यासाठी. तसेच त्यांनी गरुडाच्या नखांचा उपयोग पेंडेंट म्हणून केला असावा. काही वेळा त्यांनी नरभक्षण केले, ज्यामुळे विधिवत कारणांसाठी हे केले गेले असावे, अशी विद्वानांमध्ये चर्चा आहे.

या सर्व गोष्टी निएंडरथल विधिवत प्रथांमध्ये सहभागी होते याचे संकेत देतात. यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो : निएंडरथल मानवांना धार्मिक श्रद्धा होत्या का? तज्ज्ञांची यावर वेगवेगळी मते आहेत. हे अंशतः 'धर्म' कसा परिभाषित केला जातो यावर अवलंबून आहे. 'धर्मा'च्या व्याख्या वेगवेगळ्या असल्या, तरी त्यामध्ये सहसा दैवी शक्तींसारख्या अलौकिक अस्तित्वांवरील श्रद्धा आणि त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी केलेले संघटित विधी यांचा समावेश असतो. बोस्टन युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ मेडिसिनमधील न्यूरोलॉजीचे प्राध्यापक पॅट्रिक मॅकनामारा यांनी सांगितले की, जर 'धर्म' याचा अर्थ अलौकिक शक्तींवर आधारित विधिवत वर्तन असेल, तर होय, मला वाटते की निएंडरथल धार्मिक होते.

त्यांच्या धार्मिक श्रद्धा आणि वर्तन हे ज्याला आपण 'शमनवाद' म्हणतो, म्हणजे एक दूरदृष्टी असलेला धार्मिक अनुभव आहे, त्याच्या अगदी जवळचे असण्याची शक्यता आहे. त्यांनी विधिवत नरभक्षण केले, ते मृतदेह पुरत असत आणि ते शमनवाद्यांप्रमाणे खोल गुंफांमध्ये प्रवेश करण्याची विधिवत प्रथा पाळत असत, तसेच कवटीचे गोलाकार किंवा व्यवस्थित मांडलेले विधिवत 'वेदी' तयार करत असत, याचे चांगले पुरावे आता उपलब्ध आहेत. निएंडरथल मानवांनी ज्याला आपण 'अस्वल विधिवाद' म्हणतो, त्याचे आचरण केले आणि ते अस्वलाची देवता म्हणून पूजा करत होते, असा माझा विश्वास आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठातील उत्क्रांतीवादी मानसशास्त्राचे प्राध्यापक रॉबिन डनबर यांनी सांगितले की, 'आपण ज्या अर्थाने धार्मिक श्रद्धा मानतो, त्या अर्थाने त्यांना (निएंडरथलना) धार्मिक श्रद्धा होत्या, असे मला वाटत नाही.'

## आता पेरू येणार वेलींवर



जर तुम्हाला एखाद्या बागेत पेरूच्या झाडाच्या फांद्या कारल्याच्या वेलीसारख्या तारांवर गुंडाळलेल्या दिसल्या, तर आश्चर्यचकित होऊ नका. ही पेरूची कोणतीही नवीन प्रजाती नसून, बागायती शेतीचे हे एक नवीन तंत्रज्ञान आहे, जे उत्पादन दुप्पट करून बागायतदारांच्या उत्पन्नात वाढ करेल. प्रयागराजसह उत्तर प्रदेशातील चार जिल्ह्यांमध्ये पायलट प्रोजेक्ट म्हणून यावर काम सुरू झाले आहे. पेरूच्या उत्पादनासाठीच्या या नवीन तंत्रज्ञानाला 'इस्पेलियर सघाई प्रणाली' असे म्हणतात. या पद्धतीचा शोध लखनौ येथील केंद्रीय उपोष्ण बागवानी संस्थेच्या (Central Institute for Subtro{ical Horticulture-CIS) शास्त्रज्ञांनी लावला आहे.

शहरातील औद्यानिक प्रयोग आणि प्रशिक्षण केंद्र खुसरोबाग येथे या नवीन पद्धतीने ललित, श्वेता आणि इलाहाबादी सुरखा या पेरूच्या जातींची बाग तयार केली जात आहे. औद्यानिक प्रयोग आणि प्रशिक्षण केंद्राचे प्रभारी विजय किशोर सिंह यांनी सांगितले की, पेरूच्या बागेत सूर्यप्रकाशाची महत्त्वाची भूमिका असते. जुन्या पद्धतीत ३ ते ६ मीटरच्या अंतरावर झाडे लावली जात होती. झाड मोठे झाल्यावर त्यांच्या फांद्या संपूर्ण बागेत पसरत होत्या. सूर्यप्रकाश फक्त झाडाच्या वरच्या भागालाच मिळत होता, ज्यामुळे फळेही फक्त वरच्या फांद्यांनाच लागत होती. याच त्रुटीवर मात करण्यासाठी ही नवीन पद्धत शोधण्यात आली आहे. प्रयागराजसोबतच सीतापूर, उन्नाव आणि बाराबंकी या जिल्ह्यांमध्ये ही बागवानीच्या या पद्धतीचा अभिनव प्रयोग सुरू आहे.

या पद्धतीने तयार झालेल्या नवीन बागेतून पुढील वर्षापर्यंत फळांचे उत्पादन सुरू होईल. उत्पादन सुरू झाल्यावर हे बागायतदारांना दाखवले जाईल. निश्चितच, ही पद्धत बागायतदारांचे उत्पन्न वाढवण्यासाठी फायदेशीर ठरेल. या पद्धतीत, झाडे ओळीत लावली जातात. दोन झाडांमध्ये दोन ते तीन मीटरचे अंतर ठेवले जाते. प्रत्येक ओळीच्या दोन्ही टोकांना लोखंडी अँगल लावले जातात. याच अँगलमध्ये ठरावीक अंतरावर छिद्रे करून तारा बांधल्या जातात. रोपांच्या फांद्या जशा वाढत जातात, तसतसे त्या या तारांवर गुंडाळल्या जातात, ज्यामुळे त्या इकडे-तिकडे पसरत नाहीत. प्रत्येक रोपाला पुरेसा सूर्यप्रकाश मिळतो. फळे नेहमी नवीन फांद्यांवर येतात. त्यामुळे, फळधारणेच्या ७ ते ८ महिने आधी झाडांची छाटणी केली जाते. यामुळे जास्तीत जास्त नवीन फांद्या येतात आणि उत्पादन दुप्पट होते. आतापर्यंतच्या पद्धतीनुसार, एका हेक्टरमध्ये ३०० ते जास्तीत जास्त १,००० रोपे लावली जात होती. परंतु, या नवीन पद्धतीत रोपांमधील अंतर कमी केल्यामुळे, एका हेक्टरच्या बागेत सुमारे १,६०० रोपे लावली जाऊ शकतील. झाडांचा आकार लहान असल्यामुळे फळांवर बॅग लावणे इत्यादी कामांमध्येही सोय होईल.

## मंगळावर आढळला धातूसमृद्ध उल्कापिंड!




नासाच्या 'पर्सेव्हरन्स' रोव्हरने मंगळाच्या पृष्ठभागावर एक अत्यंत असामान्य खडक शोधला आहे. धातूने समृद्ध असलेला हा गोळेदार खडक बहुधा एक उल्कापिंड असावा, जो लाल ग्रहावर आदळला. मंगळावरील जीवसृष्टीच्या खुणा शोधण्याच्या पर्सेव्हरन्सच्या चार वर्षांच्या मोहिमेदरम्यान त्याला सापडलेला हा पहिला उल्कापिंड आहे.

२०२१ च्या सुरुवातीला मंगळावरील जेझेरो क्रेटरमध्ये उतरल्यापासून, पर्सेव्हरन्सने अनेक प्रकारचे खडक शोधले आहेत, ज्यात 'स्पायडर-एग' खडक, एक विचित्र 'कवटी' आणि सर्वात अलीकडे, अजब 'कासवाच्या आकाराची' रचना यांचा समावेश आहे. यापैकी काही खडकांनी आश्चर्यकारक परिणाम देखील दिले आहेत, जसे की सेंद्रिय-समृद्ध नमुन्यांमध्ये अलीकडेच आढळलेल्या विचित्र गाठी, जे मंगळावर भूतकाळातील परग्रहावरील जीवनाचे 'सर्वात स्पष्ट संकेत' असू शकतात.

आतापर्यंत, पर्सेव्हरन्सने सर्वेक्षण केलेल्या सर्व खडकांमध्ये एक गोष्ट समान होती की, ते मंगळावरच तयार झालेले होते. परंतु, १९ सप्टेंबर रोजी, रोव्हरच्या १६२९ व्या सोल (मंगळ दिवस) दरम्यान, जेझेरो क्रेटरमधील 'व्हरनॉडन' नावाच्या भागाचा शोध घेत असताना या फिरणाऱ्या रोबोला एक विचित्र दिसणारा खडक आढळला. हा असामान्य खडक सुमारे ३१ इंच (८० सेंटिमीटर) रुंद आहे आणि त्याला 'फिप्सक्सला' असे नाव देण्यात आले आहे. हा खडक मंगळावर तयार झालेला असण्याची शक्यता कमी आहे. 'हा खडक त्याच्या विशिष्ट, उंच उभ्या असलेल्या स्वरूपामुळे, आजूबाजूच्या सखल, सपाट आणि तुटलेल्या खडकांपेक्षा वेगळा असल्याने, अभ्यासासाठी एक आकर्षक लक्ष्य म्हणून ओळखला गेला,' असे पर्ड्यू युनिव्हर्सिटीच्या प्लॅनेटरी सायन्स विभागातील भू-रसायनशास्त्रज्ञ आणि खनिजशास्त्रज्ञ कँडिस बेडफर्ड यांनी नासाच्या निवेदनात लिहिले. खडकाचे विश्लेषण केल्यावर असे दिसून आले की, त्यात लोह आणि निकेलचे प्रमाण जास्त आहे, जे मंगळावरील खडकांमध्ये असामान्य आहे.

बेडफोर्ड यांनी लिहिले की, हे धातू उल्कापिंडांमध्ये सामान्यतः आढळतात, 'यावरून असे सूचित होते की हा खडक सूर्यमालेतील इतरत्र तयार झाला आहे.' हा उल्कापिंड मंगळावर किती कालावधीपासून आहे हे अस्पष्ट आहे; परंतु तो लाखो, कदाचित अब्जावधी वर्षांपूर्वीचा असण्याची शक्यता आहे. बेडफर्ड यांनी पुढे सांगितले की, 'एखाद्या रोव्हरला मंगळावर परग्रहावरून आलेला खडक आढळण्याची ही पहिलीच वेळ नाही.' खरं तर, यापूर्वी नासाच्या तीन वेगवेगळ्या रोव्हर्सनी, स्पिरिट, ऑपॉर्च्युनिटी आणि क्युरिऑसिटी, त्यांच्या मोहिमेदरम्यान संभाव्य उल्कापिंड शोधले आहेत. (यापैकी फक्त क्युरिऑसिटी रोव्हर अजूनही सक्रिय आहे.) बेडफर्ड यांनी नमूद केले की, 'त्यामुळे, विशेषतः गेल क्रेटरच्या जिथे क्युरिऑसिटी सध्या आहे, समान वय असूनही, पर्सेव्हरन्सला जेझेरो क्रेटरमध्ये लोह-निकेल उल्कापिंड आढळले नव्हते, हे काहीसे अनपेक्षित होते.'

## 'लिग्निन'वर नवे संशोधन



वनस्पतींना मजबूत बनवणारे आणि त्यांना उंच वाढण्यास मदत करणारे 'लिग्निन' हे जटिल रेणू पूर्वी विचार केल्याप्रमाणे पूर्णपणे यादृच्छिक नसतात. स्टॉकहोम विद्यापीठाचे प्रोफेसर एडुअर्ड पेस्केट यांच्या नेतृत्वाखालील एका नवीन आंतरराष्ट्रीय अभ्यासातून हे उघड झाले आहे की, वनस्पतींच्या शारीरिक गरजा पूर्ण करण्यासाठी लिग्निनची रासायनिक रचना आणि संरचना पेशींच्या प्रकारानुसार कशी बदलते.

'न्यू फायटोलॉजिस्ट' नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या या शोधनिबंधात या आण्विक विविधतेमुळेच वनस्पती जमिनीवर यशस्वी झाल्याचे स्पष्ट केले आहे. लिग्निनशिवाय, या जगात मॉस वगळता एकही झाड, फर्न किंवा फुले देणारी वनस्पती नसती. लिग्निन वनस्पतींच्या पेशींच्या भिंतींना बळकट करतात. ते पाणी वाहून नेण्यास मदत करतात. अतिनील किरणांपासून संरक्षण देतात आणि रोगजनकांपासून बचाव करण्यासाठी संरक्षणाचे काम करतात. याशिवाय, ते पृथ्वीवरील अंदाजे २५-३०% जैविक कार्बन साठवून ठेवतात.

स्टॉकहोम विद्यापीठाच्या प्रोफेसर कॅथरिना पावलोस्की यांच्यासह, साओ पाउलो विद्यापीठ (ब्राझील) आणि टोकियो कृषी आणि तंत्रज्ञान विद्यापीठ (जपान) येथील संशोधकांच्या सहकार्याने केलेल्या या अभ्यासात अनेक दशकांच्या संशोधनाचे संश्लेषण करून लिग्निन कसे तयार होतात आणि कसे कार्य करतात, हे स्पष्ट केले आहे. यातून दिसून आले आहे की, प्रत्येक पेशी प्रकारातील लिग्निनचे विशिष्ट स्थानिक वितरण आणि रासायनिक संरचना वनस्पती कशा प्रभावीपणे वाढतात आणि त्यांच्या पर्यावरणाशी जुळवून घेतात हे ठरवते.

साओ पाउलो विद्यापीठातील सह-लेखक प्रोफेसर इगोर सेसारिनो म्हणतात, 'वेगवेगळ्या पेशींचे प्रकार संरचनेनुसार भिन्न लिग्निन पॉलिमर तयार करतात हे आम्हाला माहीत आहे; परंतु त्यांची विशिष्ट शारीरिक भूमिका आतापर्यंत स्पष्ट नव्हती.' ते पुढे म्हणाले की, 'आमचा हा आढावा लिग्निनची रासायनिक रचना वनस्पतींचा विकास आणि पर्यावरणीय प्रतिसादांवर कसा प्रभाव टाकते, याचे गंभीर मूल्यांकन करतो.' या सर्वंकष आढाव्यात लिग्निन शब्दावलीची एक शब्दकोष, लिग्निन रसायनशास्त्रासाठी सुधारित नामकरण आणि रेणूंच्या संरचनेपासून त्यांच्या आनुवंशिक नियमांपर्यंत आणि शारीरिक भूमिकांपर्यंतचा सखोल अभ्यास समाविष्ट आहे. टोकियो कृषी आणि तंत्रज्ञान विद्यापीठाचे सह-लेखक प्रोफेसर शिन्या काजिता यांनी सांगितले, 'लिग्निन संरचनेतील विविधता वनस्पतींनी त्यांच्या दीर्घ उत्क्रांतीच्या इतिहासात केलेल्या अनेक अनुकूलन प्रक्रियेचे प्रतिबिंब आहे.' हे संशोधन वनस्पतींच्या जीवनातील एका मूलभूत संरचनेवर प्रकाश टाकते आणि त्यांच्या विकासावर व पर्यावरण बदलांना प्रतिसाद देण्यावर लिग्निनचा नेमका कसा परिणाम होतो, हे स्पष्ट करते.

## पॉकेट वॉच... किंमत २१ कोटी!

टायटॅनिक जहाज अपघाताच्या वेळी जहाजावर असलेल्या एका प्रवाशाच्या घड्याळाचा विक्रमी दरात लिलाव झाला आहे. टायटॅनिक दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या इसिडोर स्ट्रॉस यांच्या सोन्याच्या पॉकेट वॉचची लिलावात १.७८ दशलक्ष पाऊंड म्हणजेच सुमारे २१ कोटी रुपयांना विक्री झाली आहे. हा विक्रम आहे. कारण, टायटॅनिकशी संबंधित कोणत्याही वस्तूला आजपर्यंत इतकी मोठी किंमत मिळालेली नव्हती.



इसिडोर स्ट्रॉस आणि त्यांच्या पत्नी आयडा यांचा समावेश त्या १,५०० लोकांमध्ये होता, ज्यांचा मृत्यू १४ एप्रिल १९१२ रोजी टायटॅनिक बुडाल्यामुळे झाला. हे जहाज इंग्लंडमधील साऊथॅम्प्टन येथून अमेरिकेतील न्यूयॉर्क शहराकडे जात होते. टायटॅनिक अपघातानंतर काही दिवसांनी अटलांटिक महासागरातून इसिडोर स्ट्रॉस यांचा मृतदेह सापडला, तेव्हा त्यांच्या सामानामध्ये १८ कॅरेटचे गोल्ड जूल्स जर्गेसन पॉकेट वॉच देखील होते. त्यानंतर हे घड्याळ स्ट्रॉस कुटुंबाकडे होते. शनिवारी, ब्रिटनमधील विल्टशायर येथील डेवाईजेस येथील हेनड्री आल्ड्रिज अँड सन ऑक्शनियर्स मध्ये त्याची विक्री झाली. ते विकत घेण्यासाठी श्रीमंत लोकांमध्ये स्पर्धा दिसून आली आणि त्याची बोली २१ कोटींपर्यंत गेली.

इसिडोर स्ट्रॉस हे अमेरिकेचे एक प्रसिद्ध व्यापारी, राजकारणी आणि न्यूयॉर्कमधील मेसीज डिपार्टमेंट स्टोअरचे सह-मालक होते. ते त्या वेळी शहरातील सर्वात श्रीमंत लोकांपैकी एक होते. असे म्हटले जाते की, त्यांच्या पत्नीला लाईफबोटमध्ये जागा मिळाली होती; परंतु त्यांनी आपल्या पतीला सोडून जाण्यास नकार दिला आणि त्या दोघांचाही बुडून मृत्यू झाला. स्ट्रॉस यांच्या सोन्याच्या या पॉकेट वॉचमध्ये ०२.२० वाजता वेळ थांबली होती. टायटॅनिक जहाजाने पाण्याच्या लाटांखाली जाण्याचा हाच क्षण होता. हे घड्याळ आयडा स्ट्रॉस यांनी १८८८ मध्ये त्यांच्या पतीला त्यांच्या ४३ व्या वाढदिवशी भेट म्हणून दिले होते, असे सांगितले जाते. यावर स्ट्रॉस यांच्या नावाचे पहिले अक्षर कोरलेले आहेत. इसिडोर स्ट्रॉस यांचे पणतू केनेथ हॉलिस्टर स्ट्रॉस यांनी या घड्याळाची दुरुस्ती करून ते जपून ठेवले होते.

## एलियन आणि बुश यांचा संबंध काय?

एलियन म्हणजेच परग्रहवासीयांचे अस्तित्व आहे की नाही, हे विज्ञान अद्यापही ठामपणे सांगत नाही. मात्र, ब्रह्मांडाच्या या अनंत पसाऱ्यात केवळ पृथ्वीवरच जीवसृष्टी आहे, असे म्हणणे हे 'कूपमंडूक' वृत्तीचे लक्षण ठरू शकते. जगभरातून अनेक वेळा परग्रहवासीयांचे यान म्हणजेच 'युफो' पाहिल्याचे दावे करण्यात आलेले आहेत. एलियन्सबाबत सातत्याने नवे नवे दावे होतच असतात. आता एका नव्या डॉक्युमेंटरीमधून याबाबतचे धक्कादायक खुलासे करण्यात आले आहेत. एलियनसंदर्भात अमेरिकेला माहिती होती, अशी माहिती यामधून समोर आली आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच. डब्ल्यू. बुश यांना १९६४ मध्ये न्यू मेक्सिकोमधील होलोमन एअर फोर्स बेसवर एलियनच्या चकमकीची माहिती होती, असा दावा या माहितीपटात करण्यात आला आहे.



न्यूयॉर्क पोस्टच्या वृत्तानुसार, नवीन डॉक्युमेंटरीमध्ये असा दावा केला गेला आहे की, १९६४ मध्ये न्यू मेक्सिकोमध्ये एका एलियनचा सामना झाला होता. अमेरिकेतील होलोमन एअर फोर्स बेसवर ही चकमक झाली. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच. डब्ल्यू. बुश (१९८९-१९९३) यांना ही माहिती देण्यात आली. या डॉक्युमेंटरीचे नाव 'द एज ऑफ डिस्क्लोजर' असे आहे. या माहितीपटात खगोलभौतिकशास्त्रज्ञ एरिक डेव्हिस यांची एक मुलाखत आहे, ज्यामध्ये ते असे म्हणताना दिसतात की, माजी राष्ट्राध्यक्षांनी त्यांना २००३ मध्ये खासगी संभाषणादरम्यान या घटनेबद्दल सांगितले होते.

एरिक डेव्हिस हे ॲडव्हान्स्ड एरोस्पेस थ्रेट आयडेंटिफिकेशन प्रोग्रामचे सल्लागार होते. रिपोर्टनुसार, बुश यांनी दावा केला होता की, अमेरिकेच्या एअरबेसने तिन्ही स्पेसशिप पाहिल्या होत्या. त्यापैकी एकाने स्पेसशिप उतरवली होती. एलियन्सपैकी एकाने बाहेर येऊन हवाई दल आणि सीआयएच्या एका कर्मचाऱ्याशी बोलण्याचा प्रयत्न केला होता. शुक्रवारी ओटीटीवर हा माहितीपट प्रदर्शित झाला. यामध्ये परग्रहवासीयांबाबत असे अनेक दावे आणि खुलासे करण्यात आले आहेत. अअढखझ चे माजी सदस्य हॅल पुथॉफ यांनीही असा दावा केला आहे की, त्यांनी परग्रहवासीयांशी संबंधित बरेच पुरावे जप्त केले आहेत. स्टॅनफोर्ड विद्यापीठाचे संशोधक गॅरी नोलन म्हणतात की, अमेरिकन लष्कराचे जवान हवेतील काही विचित्र घटनांना बळी पडले होते, ज्यामुळे त्यांना खूप दुखापत झाली होती.

## चिम्पांझी पुराव्यानुसार बदलतात जुन्या समजुती

एका नवीन संशोधनानुसार, चिम्पांझी 'वैज्ञानिक पद्धती'चा एक प्रकार वापरतात, जेव्हा त्यांच्या जुन्या समजुती बदलण्यासाठी खात्रीलायक नवीन पुरावा मिळतो, तेव्हा ते त्वरित त्या समजुती सोडून देतात. दोनपैकी एका बॉक्समध्ये लपवलेला स्वादिष्ट खाद्यपदार्थ शोधण्याचे काम चिम्पांझींना देण्यात आले. अभ्यासात असे आढळले की, चिम्पांझींनी अनेक प्रकारच्या पुराव्यांचे मूल्यांकन केले आणि नवीन विरोधी पुरावा समोर आल्यास त्यांनी आपले निर्णय बदलले.

या निष्कर्षांवरून हे सिद्ध होते की, चिम्पांझी मेटाकोग्निशन म्हणजे विचारांवर विचार करणे. या क्षमतेचा वापर पुरावे तोलून पाहण्यासाठी आणि त्यानुसार योजना आखण्यासाठी करतात.

'जेव्हा ते त्यांच्या समजुती सुधारतात, तेव्हा ते त्यांच्याकडे असलेले पुरावे स्पष्टपणे दर्शवतात आणि ते वेगवेगळ्या प्रकारच्या पुराव्यांचे वजन करतात,' असे अभ्यासाचे सह-लेखक आणि युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्कले येथील तुलनात्मक मानसशास्त्रज्ञ जन एन्गेलमन यांनी सांगितले. मनुष्य म्हणून आपण उपलब्ध माहितीच्या आधारे योजना आखण्यासाठी पुराव्यांच्या विविध बाजूंचा विचार करण्यासाठी मेटाकोग्निशनचा नियमित वापर करतो. जेव्हा आपल्या योजना अपेक्षेप्रमाणे काम करत नाहीत, तेव्हा आपण आपल्या धोरणांमध्ये बदल करतो. शास्त्रज्ञांना हे बऱ्याच काळापासून माहीत आहे की, आदिम प्रजाती पुराव्याचे मूल्यांकन करू शकतात. चिम्पांझी अन्नाचे तुकडे शोधून खाणे शोधतात आणि जर सध्याचा पुरावा स्पष्ट नसेल तर ते अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न करतात. पण, चिम्पांझी नवीन पुराव्याच्या प्रतिसादात आपल्या समजुती बदलू शकतात का, हे जाणून घेण्यासाठी एन्गेलमन त्यांच्या टीमने अनेक वर्तणूक चाचण्या वापरल्या. या सर्व चाचण्यांमध्ये दोनपैकी एका बॉक्समध्ये खाद्यपदार्थ ठेवण्यात आले होते. पहिल्या दोन चाचण्यांमध्ये, चिम्पांझींना आतमध्ये अन्न मिळवण्यासाठी एक बॉक्स निवडण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आणि त्यांना कोणता बॉक्स अन्न धारण करतो याबद्दल दोन परस्परविरोधी पुरावे सादर केले गेले. चिम्पांझींना पहिला पुरावा दाखवला गेला आणि त्यांनी एक बॉक्स निवडला. त्यानंतर त्यांना दुसरा पुरावा देण्यात आला आणि पुन्हा निवड करण्याची परवानगी देण्यात आली.



**'सशक्त' पुरावा :** टीमने एका बॉक्सच्या बाजूला एक खिडकी कापली, ज्यामुळे चिम्पांझीला आत असलेले अन्न दिसू शकले. 'कमकुवत' पुरावा : दुसऱ्या बॉक्समध्ये काहीतरी असल्याचे दर्शवण्यासाठी संशोधकांनी तो बॉक्स हलवला. संशोधकांनी त्यांच्या पहिल्या निवडीनंतर कमकुवत पुराव्याऐवजी सशक्त पुरावा सादर केल्यावर माकडे आपले मत बदलण्याची शक्यता खूप जास्त होती. यावरून स्पष्ट होते की, चिम्पांझी केवळ पुरावा गोळा करत नाहीत, तर ते पुराव्याच्या सत्यतेचे आणि ताकदीचे मूल्यांकन देखील करतात आणि त्यानुसार आपले विचार आणि निर्णय बदलतात, जसे वैज्ञानिक करतात.

